दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

आर्वी बसस्थानकावर वृद्धाच्या खिशातून ३७ हजार रुपये लंपास

आर्वी : आर्वी बसस्थानकावर प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत एका अज्ञात चोरट्याने वृद्धाच्या खिशातील तब्बल ३७ हजार रुपये चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव बलोरा येथील रहिवासी मुकुंद बाळकृष्ण नांदूरकर (वय ७२) हे २२ ऑक्टोबर रोजी आर्वी येथील बँक ऑफ इंडिया शाखेतून ४७ हजार रुपये काढून बाहेर पडले. त्यापैकी १० हजार रुपयांचे किराणा साहित्य खरेदी केल्यानंतर उर्वरित ३७ हजार रुपये त्यांनी खिशात ठेवले.

त्यानंतर ते जळगावकडे जाणाऱ्या बसमध्ये चढले. बस आर्वी बसस्थानकातून गावाजवळ पोहोचली असता, खिशात पैसे नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत खिशातील ३७ हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

*(आष्टी) वर्धा * शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ *वर्ष ४ थे *अंक २५५ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

आमदार सुमित वानखेडे यांनी निवडणूकीत दिलेला आणखी एक शब्द पुर्ण ?

वरुण बेव्हरेजेसच्या माध्यमातून आर्वीत २,१०० कोटींची विक्रमी गुंतवणूक; आमदार सुमित वानखेडे यांच्या पाठपुराव्याला यश!

आर्वी : विधानसभा मतदारसंघाच्या औद्योगिक विकासाच्या इतिहासात एका नव्या सुवर्णपायाची भर पडली आहे. महाराष्ट्र शासनाचे उद्योग विभाग आणि नामांकित 'वरुण बेव्हरेजेस लिमिटेड' यांच्यात नुकताच एक महत्त्वाचा सामंजस्य करार संपन्न झाला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या करारामुळे वर्धा जिल्ह्यातील आर्वी एमआयडीसी क्षेत्रात तब्बल २,१०० कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक येत आहे. या ऐतिहासिक प्रकल्पाच्या माध्यमातून आर्वीचा चेहरामोहरा बदलणार असून, स्थानिक युवकांसाठी रोजगाराचे नवे दालन खुले झाले आहे. या संपूर्ण प्रकल्पाच्या मागे आमदार सुमित वानखेडे यांचा सततचा व अत्यंत महत्त्वाचा पाठपुरावा राहिला आहे.

आर्वी एमआयडीसी परिसरातील १२५ एकर जागेवर हा अत्याधुनिक एकात्मिक अन्नप्रक्रिया व एफएमसीजी प्रकल्प उभा राहणार आहे. वरुण बेव्हरेजेसचा भारतातील हा सर्वात मोठा प्रकल्प असणार असून, याद्वारे पेप्सिकोच्या जागतिक दर्जाच्या शीतपेयांसह पँकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, फळांचे रस, स्नॅक्स, चिप्स, नूडल्स तसेच दुग्धजन्य पदार्थ जसे की दूध, दही, चीज, बटर आणि आईस्क्रीमची निर्मिती केली जाईल. या प्रकल्पातील उत्पादने केवळ देशांतर्गत बाजारपेठेतच नाही, तर जागतिक स्तरावर निर्यातीसाठीही पाठवली जाणार आहेत, ज्यामुळे आर्वीचे नाव जागतिक नकाशावर झळकणार आहे.



स्थानिक पातळीवर युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात नेहमीच अग्रेसर राहिलेले आमदार सुमित वानखेडे यांच्या प्रयत्नांमुळे या प्रकल्पातून ५५० हून अधिक प्रत्यक्ष तर एकूण ३,२०० हून अधिक प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. विशेष म्हणजे, या प्रकल्पामुळे केवळ कारखान्यापुरता रोजगार मिळणार नाही, तर परिसरातील शेतकरी, दूध उत्पादक, वाहतूकदार, पॅकेजिंग युनिट्स आणि विविध पुरवठादारांसाठी एक भक्कम औद्योगिक परिसंस्थान तयार होणार आहे. स्थानिक स्तरावर फळे आणि दुधाच्या मागणीत प्रचंड वाढ झाल्यामुळे शेतकरी व कृषी क्षेत्राला हक्काची बाजारपेठ आणि सोन्याचे दिन येणार आहेत.

स्थानिक युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र झटणारे कार्यतत्पर आमदार सुमित वानखेडे यांच्या या दूरगामी व यशस्वी प्रयत्नांचे संपूर्ण परिसरातून तोंडभरून कौतुक होत आहे. हा प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी मोलाचे सहकार्य करणाऱ्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग सचिव अनबलगन साहेब आणि एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र कुशवाह यांच्यासह वरुण बेव्हरेजेसच्या व्यवस्थापनाचे आभार आमदार सुमित वानखेडे यांनी मानले आहेत. आमदार सुमित वानखेडे यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे आर्वीच्या विकासाला एक नवी व मोठी गती मिळाली आहे.

सुजातपुर व सिरकुटनी येथे तहसिलदारांची गावभेट

गावभेट अभियानांतर्गत ग्रामपंचायतींना भेटी

वर्धा : शासनाच्यावतीने नागरिकांच्या दैनंदिन व पायाभूत सुविधांबाबतच्या तक्रारींचे स्थानिक स्तरावर वर्गीकरण, उपाययोजना व कायदेशीर दृष्टिकोनातून जलद निवारण करण्यासाठी, शासकीय योजना व सार्वजनिक सेवांची प्रत्यक्ष पडताळणी तसेच स्थानिक संस्थांचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने 'गावभेट अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आष्टीच्या तहसिलदार यांनी ग्रामपंचायत सुजातपूर व सिरकुटनी येथे गावभेट देऊन गावातील समस्या बाबत नागरिकांशी संवाद साधला.



या गावभेट अभियानामध्ये नागरिकांशी संवाद साधून गावातील पायाभूत सेवा व सुविधा जसे की, वीज, रस्ते, पाणी इत्यादी बाबतच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे निराकरण तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सुजातपूर व सिरकुटनी येथे प्राथमिक शाळा व अंगणवाडी केंद्रास भेट देऊन तेथील पायाभूत सुविधांबाबत पंचायत समिती, आष्टी यांना कळविण्यात आले. बळीराजा पांदण रस्त्यामध्ये दोन रस्ते अंतिम करण्यात आले. पाणीटंचाई अनुषंगाने सुजातपूर व सिरकुटनी येथील सार्वजनिक पाणीपुरवठा विहिरी, ममदापूर कॅनल गेट व ममदापूर कॅनल रेग्युलेटरला भेट देण्यात आली आणि त्या अनुषंगाने अपर वर्धा धरण उपअभियंत्यांना दुरुस्तीच्या सूचना देण्यात आल्या.

गावभेट दरम्यान मंडळ अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, सुजातपूरचे माजी सरपंच तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासकीय आश्रमशाळा हिरापूर (तळणी) येथे प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांचा उत्साहात शुभारंभ

वर्धा : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, वर्धा अंतर्गत आयोजित तीन दिवसीय प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ शासकीय आश्रमशाळा, हिरापूर (तळणी) येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या स्पर्धा दिनांक २८ ते ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत.



या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून पंचायत समिती देवळीच्या गटशिक्षणाधिकारी अश्विनी नेमाडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी गीतांजली निकम होत्या. यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी निखिल वाघ, वैभव पाखरे व शैलेंद्र खडसे तसेच प्रकल्पांतर्गत सर्व आश्रमशाळांचे मुख्याध्यापक व इतर मान्यवर उपस्थित होते.

या क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना वाव देणे, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढविणे तसेच सांघिक भावना, शिस्त, नेतृत्वगुण आणि खिलाडूवृत्ती विकसित करणे व शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य सिद्ध करावे आणि सर्वांगीण विकास साधन्याच्या दृष्टीने स्पर्धांचे आयोजन महत्त्वपूर्ण ठरते. असे अश्विनी नेमाडे म्हणाल्या.

स्पर्धादरम्यान विविध मैदानी व क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थी उत्साहाने सहभागी होत असून, खेळाडूंमध्ये चुरशीची स्पर्धा आणि विजयासाठीचा उत्साह दिसून येत आहे. विविध आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना आपले क्रीडाकौशल्य सादर करण्यासाठी या स्पर्धांचा माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये परस्पर सहकार्य, संघभावना आणि सकारात्मक स्पर्धात्मक दृष्टिकोन वृद्धिंगत होण्यास मदत होते, असे गिंतांजली निकम म्हणाल्या.

या स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक सक्षमता आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत अशा उपक्रमांना महत्त्व दिले जात आहे. या तीन दिवसीय क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण होऊन भविष्यात जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर चमकण्याची संधी मिळण्यास मदत होईल. असेही पुढे बोलतांना गिंतांजली निकम म्हणाल्या. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्ह्यात १,२९,४४४ शेतकऱ्यांच्या खात्यात २५ कोटी ८८ लाख जमा होणार

प्रधानमंत्री किसान सन्मानच्या २३ व्या हप्त्याचे आज वितरण

वर्धा : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत ऑगस्ट ते नोव्हेंबर या कालावधीतील २४ व्या हप्त्याचे वितरण पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात बनासकांठा, गुजरात येथून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते ३० ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत देशातील लाभार्थी शेतकऱ्यांना ऑगस्ट ते नोव्हेंबरचा २४ व्या हप्त्यातील देय लाभ जिल्ह्यातील एकूण १,२९,४४४ लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण २५ कोटी ८८ लाख ८८ हजार रक्कम रुपये बनासकांठा, गुजरात येथून ऑनलाईन समारंभामध्ये वितरीत होणार आहे. योजनेच्या २५ व्या हप्त्यापासून शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी) अनिवार्य करण्यात आलेले असून शेतकरी ओळखपत्र नसलेल्या शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा २५ व्या हप्त्यापासून लाभ अदा केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

या समारंभाचे थेट प्रक्षेपण कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा, ग्रामपंचायतस्तरावरून तसेच तालुक्यातील गावोगावी कृषि विभागामार्फत मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक यांनी आयोजन केले आहे. लाभ वितरण समारंभामध्ये http://pmindiawebcast.nic.in या लिंकव्दारे जास्तीत जास्त शेतक-यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी अरविंद उपरीकर यांनी केले आहे.

दुष्काळाच्या झळा महिलांना अधिक; राष्ट्रवादी महिला काँग्रेसची सरकारकडे विशेष उपाययोजनांची मागणी

'दुष्काळ आणि महिलांचे प्रश्न' अभियानातून महिला जनसंवाद; महिलांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित

वर्धा : महाराष्ट्रात सध्या दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, त्याचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील महिला आणि कुटुंबांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाच्या महिला आघाडीतर्फे २५ ते ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'दुष्काळ आणि महिलांचे प्रश्न' या अभियानांतर्गत महिलांशी जनसंवाद साधण्यात येत आहे.



याबाबत पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. माजी खासदार राष्ट्रवादी महिला सेलच्या राष्ट्रीय अध्यक्ष फौजिया खान, माजी आमदार विद्याताई चव्हाण, महिला प्रदेश अध्यक्ष रोहिणी खडसे या प्रामुख्याने उपस्थित होत्या.

राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा खासदार डॉ. फौजिया खान यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत शासन आणि प्रशासनाकडून महिलांच्या प्रश्नांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचा आरोप करत महिला आघाडीने सरकाराकडे विविध मागण्या मांडल्या आहेत.

या अभियानादरम्यान गावोगावी महिलांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या जात आहेत. या मागण्यांसंदर्भात खासदार तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना २८ सप्टेंबर २०२६ रोजी पत्र पाठविल्याचे प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. मात्र, सरकारचे लक्ष दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीकडे नसल्याची टीका महिला आघाडीने केली आहे. दुष्काळाचा परिणाम केवळ शेती आणि शेतमालाच्या उत्पन्नापुरता मर्यादित राहत नाही. पाणीटंचाई, रोजगार, आरोग्य, पोषण, महिलांची सुरक्षितता तसेच मुलांच्या शिक्षणावरही त्याचे गंभीर परिणाम होतात. त्यामुळे दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र तरतूद, विशेष आर्थिक मदत आणि त्यांच्या गरजांनुसार योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

महिला जनसंवादातून पाणीटंचाई दूर करण्यासाठी पाण्याचे स्रोत आटलेल्या गावांमधील विहिरींचे पुनर्भरण तसेच महिलांचे पाण्यासाठी होणारे कष्ट कमी करण्यासंबंधीच्या उपाययोजना शासनापुढे मांडण्यात येणार आहेत. दुष्काळग्रस्त महिलांना दिलासा देण्यासाठी सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या महिला आघाडीने केली आहे. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे वर्धा जिल्हा अध्यक्ष अतुल वांदिले, महिला अध्यक्षा योगिता इंगळे, युवती अध्यक्ष डॉ. माधवी पाटील, नगरसेविका मनीषा प्रशांत लोणकर, शीतल अमोल बोरकर, सुनील राऊत, महिला शहर अध्यक्ष शुभांगी डोंगरे, सह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या, तसेच शहरातील व ग्रामीण भागातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते देखील उपस्थित होते.



संपादकीय



वादग्रस्त विधानांची मालिका

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वडिलांबाबत केलेल्या अवमानजनक विधानामुळे देशात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या मुद्दावर भाजपाने आक्रमक भूमिका घेणे स्वाभाविकही आहे. खडगे वयाने आणि अनुभवाने सर्वात ज्येष्ठ नेते आहेत. संयमी, मुत्सद्दी आणि प्रगल्भ नेते अशी त्यांची प्रतिमा आहे. त्यामुळे त्यांच्यासारख्या नेत्याकडून पंतप्रधानांच्या वडिलांबाबत आणि विधानाची अपेक्षा नव्हती. विशेष म्हणजे खडगे यांनी मोदी यांचा असा अवमानजनक उल्लेख करण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२३ मध्ये कर्नाटकातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात खडगे यांनी मोदी यांची तुलना 'जहरीला सांप' अशी केली होती. यावरून गदारोळ झाल्यानंतर खडगे यांनी कोलारेटडी मारत मी हा शब्द मोदी यांच्यासाठी नाही तर भाजपाच्या विचारधारेसाठी वापरला, असा न पटणारा खुलासा केला होता.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे त्यांच्या बेजबाबदार विधानासाठी आणि वाणगूकीसाठी ओळखले जातात. खडगे यांनी राहुल गांधी यांना साथ द्यायची, अशी अपेक्षा असताना राहुल गांधी यांनीच खडगे यांना बिघडवले की काय, अशी शंका आता सर्वांनाच येऊ लागली आहे. खडगे यांच्या तोंडून अनवधानाने असे विधान निघाले असेल तरी, त्यासाठी त्यांनी आत्तापर्यंत माफी मागितलेली दिसली नाही. त्यामुळे त्यांनी आपले विधान ठरवून आणि जाणीवपूर्वक केले, अशी शंका घ्यायला जागा आहे.

राजकारणातील नेत्यांनी वादग्रस्त विधान करण्याची आपल्या देशातील ही पहिली वेळ नाही. आतापर्यंत किमान इझन दोन इझन नेत्यांनी अशी वादग्रस्त विधाने करत खळबळ उडवली आहे. काही वेळा अशी विधाने बोलण्याच्या ओघात निघून जातात, तर अनेकवेळा ती ठरवून आणि जाणीवपूर्वक केली जातात. प्रसिद्धी मिळवण्यासाठी वा चर्चेत राहण्यासाठी पुष्कळवेळा राजकीय नेते अशी विधाने करत असतात. एखादे विधान अंगलट येत आहे, असे दिसले तर माझ्या विधानाचा विरोधकांनी विपर्यास केला, मला तसे बोलायचे नव्हते, असे म्हणायला हे नेते मोकळे असतात. खूपच झाले तर खेद व्यक्त करून हे नेते काही झालेच नाही, अशा आविर्भावात वागू लागतात. विशेष म्हणजे अशी वादग्रस्त विधाने करण्यात कोणत्याच पक्षाचे नेते मागे नसतात. विरोधी वा सत्ताधारी असा फरक यात राहत नाही. मात्र तुलनात्मकदृष्ट्या विचार केला तर काँग्रेस नेते यात आघाडीवर दिसतात. राजकीय नेत्यांना काय बोलायचे यापेक्षा काय बोलू नये, हे समजले पाहिजे.राजकीय बातम्या वाचा

२००७ मध्ये गुजरात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सोनिया गांधींनी नरेंद्र मोदी यांचा उल्लेख 'मौत का सौदागर' असा केला होता. मोदी तेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री होते. काँग्रेसचेच अन्य एक नेते मणिशंकर अय्यर यांनी २०१४ च्या आधी मोदी यांचा 'चायवाला' असा खिल्ली उडवणारा उल्लेख केला होता. २०१७ मध्ये अय्यर यांनी मोदी यांना 'नीचकिस्म का आदमी' असे म्हटले होते. अय्यर यांनी मोदी यांना चायवाला असे म्हटले त्याचा भाजपाला लोकसभा निवडणुकीत फायदाच झाला. भाजपाने देशभर 'चाय पे चर्चा' कार्यक्रमाचे आयोजन करत याचा राजकीय फायदा उचलला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत हरयाणातील अंबाला येथील सभेत बोलताना काँग्रेसच्या प्रियांका वढेरा यांनी मोदी यांची तुलना महाभारतातील दुर्योधनाशी केली होता.

राहुल गांधी यांनी केलेल्या वादग्रस्त विधानांची तर मोठी मालिकाच आहे. २०१९ मध्ये कर्नाटकातील कोलार येथील एका सभेत राहुल गांधी यांनी 'सर्व चोरांचे आडनाव मोदी का असते', असे विधान करत खळबळ उडवली होती. विशेष म्हणजे या प्रकरणात न्यायालयाने त्यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षाही सुनावली होती. त्यामुळे राहुल गांधींना आपले लोकसभा सदस्यत्व गमवावे लागले होते.कायदे पहा

२०१४ मध्ये भिवंडी येथील सभेत राहुल गांधी यांनी महात्मा गांधी यांच्या हत्येसाठी रा. स्व. संघ जबाबदार असल्याचा खोडसाळ, निराधार आरोप केला होता. या प्रकरणी मानहानीचा खटला त्यांच्यावर खटलाही चालला होता. या प्रकरणात सात्यकी सावरकर यांनी फौजदारी मानहानीचा खटला दाखल केला, त्यावर 'माफी मागायला मी काही सावरकर नाही', असे आणखी एक वादग्रस्त विधान राहुल गांधी यांनी केले होते.

मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांनी आपल्या वादग्रस्त विधानाने आपल्या पक्षाला आणि सरकारला अनेकवेळा अडचणीत आणले आहे. संपुआ सरकारच्या काळात दोन सत्ताकेंद्रे (सोनिया गांधी आणि डॉ. मनमोहनसिंग) योग्य प्रकारे काम करत नसल्याचा आरोप दिग्गीराजा यांनी करत आपल्याच पक्षाला आणि सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला होता. पुलवामा घटनेनंतर दिग्विजयसिंह यांनी सर्जिकल स्ट्राईकवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्याचे पुरावे मागितले होते. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम हटवण्याचा निर्णयाला विरोध करत दिग्विजयसिंह यांनी काँग्रेस सरकार सत्तेत आल्यावर ३७० कलम पुन्हा बहाल करण्याचे आश्वासन दिले होते. हिंदू लोक गोमांस खात असल्याचा तसेच सावरकरही गोमांसभक्षक असल्याचा आरोप दिग्विजयसिंह यांनी केला होता. रा. स्व. संघाची तुलना दिग्विजयसिंह यांनी पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) शी केली होती, तसेच ओसामा बिन लादेन यांचा उल्लेख 'ओसामाजी' असा आदराथी करत आपली लायकी दाखवली होती.

काँग्रेसचे सर्वात जास्त नुकसान भाजपा आणि भाजपा नेत्यांनी नाही तर काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेत्यांनीच केले, असे म्हटले तर ते चूकठरू नये. गेल्या १५ ते २० वर्षात देशातील राजकारणाचा पोत बदलला आहे. त्याच्या आधीचे राजकारणी, मग ते कोणत्याही पक्षाचे असो, अतिशय सभ्य आणि संयमित भाषेत बोलत होते. समोरच्या नेत्यावर टीका करतानाही आपल्या भाषेचा दर्जा आणि पातळी घसरणार नाही, याची काळजी घेत असत. बोलण्याच्या ओघात एखादा वावगा शब्द तोंडातून निघून गेला तर मनाचा मोठेपणा दाखवत माफी मागायलाही मागेपुढे पाहत नव्हते.

संभ्रमाच्या गदारोळात शहाणपणाचीच गरज!



सुमारे ५६ वर्षांपूर्वीची गोष्ट! 'महासत्ता' म्हणून जागतिक प्रतिष्ठा मिरविणाऱ्या अमेरिकेच्या राजधानी वॉशिंग्टनमधील त्या रात्रीला अजून पहाटेची चाहूल लागली नव्हती. पोटोमॅक नदीच्या काठावर उभ्या असलेल्या वॉटरगेट संकुलातील डेमोक्रॅटिक पक्षाच्या राष्ट्रीय मुख्यालयात मात्र काही माणसे दबक्या पावलांनी वावरत होती. त्यांनी आपली ओळख लपविण्याचा बेमालूम प्रयत्न केला होता. मुख्यालयातील अनेक कागदपत्रांच्या फायली घाईघाईने उघडल्या जात होत्या. महत्त्वाची कागदपत्रे फायलींमधून बाजूला काढली जात होती. रात्रीच्या अंधारात सुरू असलेल्या त्या कारवाईत सामील असलेल्या चार-पाच जणांना चोरी करायची नव्हती. राजकीय विरोधकांच्या हालचालींवर नजर ठेवणे, परस्परांतील संभाषणचे धागेदोरे मिळविण्यासाठी त्यांच्या फोनमध्ये काही गुप्त साधने बसवून गुप्त माहिती मिळवणे आणि निवडणुकींच्या राजकारणात आघाडी मिळवण्यासाठी प्रतिस्पर्ध्यांच्या गोटात डोकावणे, हा त्या कारवाईमागील संशयित हेतू होता.

दिवस उजाडण्याआधी ही मोहीम फत्ते होईल आणि निवडणुकींच्या राजकारणात विरोधकांवर कुरघोडी मिळविणे सहज होईल असे त्या पाच जणांना कदाचित वाटत होते. विरोधकांच्या गोटातील गुपितांची काही कुलपे उघडतील, काही गुप्त माहिती हाती लागेल आणि सकाळ होण्याआधी मोहीम पूर्ण होऊन काही घडलेच नाही असे भासविणारा दिवस उजाडेल असे त्यांना वाटले असावे. पण त्या रात्रीच्या त्या लहानशा घटनेत अमेरिकेच्या राजकारणाला आणि राजकीय इतिहासाला हादरवून टाकणारे अभूतपूर्व वादळ जन्माला येत होते. डेमोक्रॅटिक पक्षाच्या मुख्यालयात घुसखोरी करणाऱ्यांनाही त्याची कल्पना नसावी. पण तसे घडले नाही. त्या एका घटनेनंतर अमेरिकेच्या राजकीय इतिहासात ते वादळ प्रचंड वेगाने घोंघावले. मोठी पडझड झाली आणि अमेरिकेच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्षांना राजीनामा देऊन पायउतार व्हावे लागले. या वादळाचे नाव होते, 'वॉटरगेट'!

डेमोक्रॅटिक पक्षाच्या मुख्यालयातील संशयास्पद हालचालींचा सुगावा तेथील पहारेकऱ्यांस लागलाच आणि १७ जून १९७२ रोजी घुसलेल्या पाच जणांना पोलिसांनी अटक केली. हा एखाद्या सामान्य घरफोडीचा प्रकार असावा असे सुरुवातीला पोलिसांनाही वाटले, पण त्यांची कसून झडती घेतल्यानंतर मात्र, या घटनेचे गांभीर्य लक्षात येऊन त्यांचे धाबे दणाणले. घुसखोरांकडे सापडलेली उपकरणे, गुप्त संभाषणे टिपण्याचे प्रयत्न आणि या कारवाईमागे असलेल्या व्यक्तींचे राजकीय संबंध यामुळे तपासाला वेगळे वळण मिळाले. अमेरिकेत त्या वेळी राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक जवळ आली होती. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन पुन्हा निवडून येण्यासाठी सज्ज होते. अशा वेळी त्यांच्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांच्या मुख्यालयात घुसखोरी झाल्याने या घटनेकडे केवळ चोरीचा कट म्हणून पाहिले जाणे शक्यच नव्हते. राजकीय हालचालींचे केंद्र असलेल्या एका इमारतीत झालेली घुसखोरी आणि जगातील सर्वात शक्तिशाली लोकशाही देशाच्या राष्ट्राध्यक्षांभोवती निर्माण होणारे संशयाचे वर्तुळ यांच्यामधील अंतर सुरुवातीला मोठे होते. मात्र तपास जसजसा पुढे सरकत गेला, तसतसे या अंतरातील दुवे उलगडू लागले. थेट राष्ट्राध्यक्ष निक्सन यांच्या निवडणूक मोहिमेशी निगडित व्यक्तींशी घुसखोरांचा संबंध असल्याचे समोर आले. या प्रकरणाने अमेरिकेच्या राजकारणात खळबळ उडवली.

याच टप्प्यावर, माध्यमांनी निर्णायक भूमिका बजावली. 'वॉशिंग्टन पोस्ट' या वृत्तपत्राच्या बॉब वुडवर्ड आणि कार्ल बर्नस्टीन या दोन पत्रकारांनी या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा सुरू केला. केवळ एक खळबळजनक बातमी प्रसिद्ध करणे आणि बायलाईन मिरविणे, एवढेच त्या दोघांसमोरील आव्हान नव्हते. या प्रकरणात संबंधित असलेल्या काही प्रतिष्ठित व्यक्ती, त्यांमधील आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार, एकमेकांशी असलेल्या राजकीय संबंधांचा गुंता आणि परस्परविरोधी दावे या साऱ्यांची संगतवार उकल करून त्यामागील सत्य शोधण्यासाठी जबाबदारी आणि मोठी जोखीमही त्यांच्यावर होती. हाती आलेल्या प्रत्येक माहितीची पुराव्यानिशी खातरजमा करणे, गोपनीय सूत्रांकडून मिळालेल्या तपशिलांची सखोल पडताळणी करणे आणि दबावाला न जुमानता तपास सुरू ठेवणे, हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या वृत्तांकनामुळे वॉटरगेट प्रकरणातील संशयाचे धागे हळूहळू स्पष्ट होऊ लागले. या पत्रकारांना माहिती पुरवणाऱ्या एका गोपनीय सूत्राची ओळख अनेक वर्षे गुप्त राहिली. त्याला 'डीप थ्रोट' या सांकेतिक नावाने ओळखले जात असे. पुढे २००५ मध्ये एफबीआयचे माजी उपसंचालक मार्क फेल्ट यांनीच हे सूत्र आपण असल्याचे जाहीर केले आणि सत्तेच्या दालनांमध्ये घडणाऱ्या घटनांवर प्रकाश टाकणारी माहिती उजेडात आली.

मात्र, 'वॉटरगेट' नावाने जागतिक राजकीय पटलावर सर्वाधिक 'हिट' ठरलेल्या या प्रकरणाची कथा केवळ दोन पत्रकारांच्या चिकाटीची किंवा काही घुसखोरांच्या अटकेची कथा नव्हती. तिच्या मुळाशी सत्तेचा हव्यास, विरोधकांवर पाळत ठेवण्याची वृत्ती आणि गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांना झाकण्याची धडपड होती. घुसखोरीच्या प्रकरणातून लक्ष हटवणे, संबंधित व्यक्तींना पैसे देऊन गप्प ठेवण्याचे प्रयत्न करणे आणि तपासाच्या दिशेवर परिणाम घडवून आणणे, अशा बाबी यातून पुढे आल्या. १९७३ मध्ये अमेरिकेच्या सिनेटने वॉटरगेट प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष समिती स्थापन केली. समितीच्या सार्वजनिक सुनावण्यांचे दूरचित्रवाणीवरून प्रसारण होऊ लागले. त्यातून हेही त्यामुळे अमेरिकेतील सामान्य नागरिकांनाही या प्रकरणातील तपशील थेट पाहता आणि ऐकता आले. व्हाईट हाऊसमध्ये नेमके काय घडले होते, निवडणूक मोहिमेशी संबंधित व्यक्तींची भूमिका काय होती आणि राष्ट्राध्यक्षांच्या कार्यालयाला या प्रकरणाची कितपत माहिती होती,

या प्रश्नांनी देशाचे राजकारण ढवळून निघाले. या सुनावण्यांमध्ये माजी व्हाईट हाऊस सल्लागार जॉन डीन यांच्या साक्षीला विशेष महत्त्व प्राप्त झाले. प्रशासनाच्या अंतर्गत घडामोडींची माहिती असलेल्या डीन यांनी प्रकरण हाताळण्याच्या पद्धतीबद्दल गंभीर बाबी मांडल्या. राष्ट्राध्यक्षांच्या कार्यालयातील चर्चांबद्दल आणि तपासात अडथळे आणण्याच्या प्रयत्नांबद्दल समोर आलेल्या माहितीनंतर निक्सन प्रशासनावरील दबाव वाढत गेला. व्हाईट हाऊसच्या दाराआड चाललेल्या राजकारणाचे स्वरूप आता देशासमोर उघड होऊ लागले होते.

या प्रकरणातील सर्वात नाट्यमय वळण मात्र राष्ट्राध्यक्षांच्या कार्यालयातील संभाषणांच्या ध्वनिमुद्रणांमुळे आले. या ध्वनिमुद्रणांवरून व्हाईट हाऊस आणि तपास यंत्रणांमध्ये संघर्ष निर्माण झाला. राष्ट्राध्यक्षांच्या अधिकारांना मर्यादा आहेत का, चौकशीच्या प्रक्रियेत न्यायालयांना अध्यक्षीय कार्यालयातील पुरावे मागवता येतात का, राष्ट्रीय सत्तेच्या सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीलाही कायद्याच्या चौकटीत राहावे लागते का, हे प्रश्न केवळ अमेरिकेपुरते मर्यादित राहिले नाहीत. ते लोकशाही व्यवस्थेच्या मूलभूत स्वरूपाशी संबंधित होते. २४ जुलै १९७४ रोजी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने युनायटेड स्टेट्स विरुद्ध निक्सन या प्रकरणात एकमताने महत्त्वपूर्ण निर्णय दिला. राष्ट्राध्यक्षांनी मागणी केलेली ध्वनिमुद्रणे सादर करावी, असा आदेश न्यायालयाने दिला आणि हे प्रकरण निक्सन यांच्या अंगाशी येऊ लागले. पदावर राहण्याच्या त्यांच्या क्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले. न्यायालयीन प्रक्रियेने आणि सार्वजनिक चर्चेने त्यांच्या प्रशासनाभोवतीचे संरक्षण कमकुवत केले होते.

एकेकाळी प्रचंड राजकीय ताकद असलेल्या राष्ट्राध्यक्षांना आता आपल्या पदाच्या भविष्याचा विचार करावा लागत होता. ऑगस्ट १९७४ मध्ये परिस्थिती निर्णायक टप्प्यावर पोहोचली. ८ ऑगस्ट रोजी रिचर्ड निक्सन यांनी दूरचित्रवाणीवरील भाषणातून राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. एका घुसखोरीपासून सुरू झालेल्या प्रकरणाचा शेवट राष्ट्राध्यक्षांच्या राजीनाम्यात झाला होता. हा केवळ एका राजकीय नेत्याचा पराभव नव्हता; तर सत्तेच्या गैरवापरावर नियंत्रण ठेवणाऱ्या लोकशाही संस्थांच्या सामर्थ्याची कसोटी होती.

वॉटरगेट प्रकरणाने राजकारणातील कुरघोडींच्या, सत्ताकारणाच्या कारवायांचा नवा पट जगासमोर उलगडला गेला. राजकारणात, विशेषतः सत्तेच्या राजकारणात सर्वत्र असे चालतच असते, ही बाब उघड झाली. अशा कारवाया गुप्तपणे चालतात, कधी त्या सर्वात सुरक्षित वाटणाऱ्या, कडेकोट बंदोबस्ताच्या चौकटीत जन्म घेतात, तर कधी त्यांची सुरक्षा भेदून गुपिते बाहेर काढण्याचे तंत्र त्यावरच कुरघोडी करते.

संकटात बळीराजाला शासनाचा भक्कम आधार; दुष्काळ निवारणासाठी महाराष्ट्राची व्यापक तयारी!

राज्य शासनाने राज्यात दुष्काळामुळे होणाऱ्या पीक नुकसानीपासून पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, रोजगार आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणापर्यंत सर्वंकष उपाययोजना आखल्या आहेत; ३०४ तालुक्यांतील दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी मदत व सवलतींचे कवच निर्माण केले आहे.

महाराष्ट्राची ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीवर आधारलेली आहे. शेतकऱ्यांच्या शेतातल्या पिकांमध्ये त्याच्या कुटुंबाची स्वप्ने, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची आशा, दैनंदिन घरखर्चाची तरतूद आणि पुढील हंगामासाठीची तयारी केलेली असते. त्यामुळे एखाद्या वर्षी पाऊस कमी पडल्याने डोळ्यांसमोर उभे असलेले पीक करपू लागले, की त्याचा परिणाम संपूर्ण शेतकरी कुटुंबावर होतो. अशा वेळी संकटाची तीव्रता ओळखून तातडीने मदतीचा हात देणे, उपलब्ध साधनसंपत्तीचे नियोजन करणे आणि शेतकऱ्यांचा विश्वास कायम राखणे ही राज्य शासनाची महत्त्वाची जबाबदारी ठरते.

खरीप हंगाम २०२६ मध्ये महाराष्ट्रातील अनेक भागांत अपुऱ्या पावसामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि राज्यातील अन्य भागांमध्येही पावसाच्या अनियमिततेचा परिणाम पिकांच्या वाढीवर, उत्पादनावर आणि ग्रामीण जीवनमानावर जाणवू लागला आहे. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेणे, बाधित भागांचे सर्वेक्षण करणे आणि शेतकरी व ग्रामीण कुटुंबांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यावर भर दिला आहे.

दुष्काळ म्हणजे केवळ पावसाची कमतरता नव्हे!

दुष्काळ ही केवळ कमी पावसाची स्थिती नसून पाण्याची उपलब्धता, जमिनीतील ओलावा, पिकांची स्थिती, जलसाठ्यांची पातळी आणि पाणी व चाऱ्याच्या गरजा यांच्यावर परिणाम करणारी व्यापक नैसर्गिक आपत्ती आहे. एखाद्या वेळी पाऊस सरासरीपेक्षा कमी पडला तर मात्र सगळेच चित्र बदलते. काही ठिकाणी पेरणी झाल्यानंतर पाऊस न पडल्याने पिकांची वाढ खुंटते, तर काही ठिकाणी फुलोरा किंवा शेंगा भरण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेत पावसाच्या पाण्याअभावी उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण होते.

दुष्काळाचे परिणाम शेतीच्या बांधावर थांबत नाहीत. पिकांचे उत्पन्न कमी झाल्याने शेतकऱ्यांच्या हातात येणारा पैसा घटतो. शेतीवरील मजुरांना काम मिळण्याचे प्रमाण कमी होते. जनावरांसाठी चारा आणि पाण्याची उपलब्धता हा प्रश्न निर्माण होतो. पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढू शकते. कुटुंबाचा दैनंदिन खर्च, कर्जाचे हप्ते आणि मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागविणेही कठीण होऊ शकते. म्हणूनच दुष्काळाचा विचार करताना पीक नुकसानीबरोबरच शेतकरी, शेतमजूर, पशुधन आणि ग्रामीण



अर्थव्यवस्थेच्या सर्व घटकांचा विचार करणे आवश्यक असते.

यंदाच्या परिस्थितीत राज्य शासनाने याच व्यापक दृष्टिकोनातून अनेक उपाययोजना आखण्यावर भर दिला आहे. शेतकऱ्याला केवळ आर्थिक मदत देणे नव्हे, तर त्याच्या कुटुंबाच्या मूलभूत गरजा सुरक्षित ठेवणे आणि पुढील हंगामासाठी आवश्यक आधार उपलब्ध करून देणे, हा या प्रयत्नांचा महत्त्वाचा भाग आहे.

शासन निर्णयातून मदत आणि सवलतींचे व्यापक कवच!

दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शासनाने दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार कार्यवाही केली आहे. कृषी आयुक्तांनी खरीप हंगाम २०२६ चा आढावा घेऊन सादर केलेल्या अहवालाच्या आधारे २६ सप्टेंबर २०२६ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. त्यानुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ परिस्थिती घोषित करून 'ट्रिगर-१' अर्थात प्रथम कळ लागू करण्यात आली. या निर्णयामुळे बाधित तालुक्यांमध्ये दुष्काळ निवारणासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही आणि विशेष सवलती लागू करण्याचा मार्ग मोकळा झाला. यानंतर १४ ऑक्टोबर २०२६ रोजी आणखी ३९ तालुक्यांत दुष्काळ राज्य शासनाने जाहीर केला.

या शासन निर्णयाचे महत्त्व केवळ दुष्काळ घोषित करण्यात नाही, तर संकटाच्या विविध पैलूंना एकाच वेळी प्रतिसाद देण्याच्या दृष्टिकोनात आहे. शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीतून सावरण्यासाठी जमीन महसूलात सूट, पीककर्जाचे पुनर्गठन आणि शेतीशी संबंधित कर्जवसुलीस स्थगिती यासारख्या उपाययोजनांचा समावेश आहे. कृषीपंपांच्या वीजबिलाबाबतही सवलती देण्यात आल्या आहेत. यापूर्वी ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांचे वीजबिल माफ करण्यात आले होते; त्यावरील क्षमतेच्या पंपांसाठीही शासन निर्णयात नमूद केलेली सवलत लागू होणार आहे. तसेच टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषीपंपांचा वीजपुरवठा खंडित केला जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे.

दुष्काळाचा फटका शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाला बसू नये यासाठी, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी रोजगार हमीच्या कामांचे निकष शिथिल करून अधिकाधिक कामे सुरू करण्यावर भर देण्यात आला आहे. आवश्यक त्या ठिकाणी टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविणे, जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे आणि शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना अन्नधान्याचा पुरेसा पुरवठा करणे, अशा उपाययोजनांचाही या निर्णयात समावेश आहे.

विविध बारा उपाययोजना आणि सवलतींकडे पाहताना शासनाने दुष्काळाला केवळ कृषीविषयक समस्या न मानता सामाजिक आणि आर्थिक संकट म्हणून ग्राह्य धरले आहे. शेतकऱ्याचा हातातील पीक गेले, तरी त्याच्या कुटुंबाच्या जगण्याचा आधार कोलमडू नये, त्याच्या मुलांचे शिक्षण थांबू नये आणि जनावरांची उपासमार होऊ नये, यासाठी विविध पातळ्यांवर मदतीचे कवच उभे करण्याचा हा प्रयत्न आहे. पीक नुकसानीची आर्थिक मदत निश्चित करण्यासाठी प्रत्यक्ष पंचनामे, पिकांची स्थिती आणि विहित कार्यपद्धती पूर्ण करण्यात येत आहे.

संकटात बळीराजाला शासनाचा भक्कम आधार!

– ३०४ तालुक्यातील एकूण ३७ हजार ४९६ गावे समाविष्ट; मदत व सवलतीचे राज्य शासनाचे कवच.

– दुष्काळग्रस्त तालुक्यांतील शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी दिलासा देण्यासाठी त्यांच्या खात्यात प्रत्येकी ५ हजार

रुपये देण्याचा निर्णय.

– राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानाचे ९० टक्के पंचनामे पूण.

– राज्यात दुष्काळामुळे झालेल्या पीक नुकसानीपासून ते पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, रोजगार, मोफत

अन्नधान्याचा पुरवठा आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण अशा विविध उपाययोजना

– अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत आतापर्यंत ७४ टक्के धान्य वितरण.

– जलस्त्रोतांचे चळकटीकरण, नाला खोलीकरण, जलसंधारणाची कामे वेगाने पूर्ण करण्यावर भर

– ७५ टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने सुरू करण्याच्या सूचना.

– दुष्काळग्रस्त गावांतील अंगणवाड्यांना टँकरद्वारे प्राधान्याने पाणीपुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायत व पाणीपुरवठा समित्यांशी समन्वय.

– दुष्काळग्रस्त तालुक्यातील २ लाख ४० हजार ३६५ विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी.

– ऊसतोड व वीटभट्टी कामगारांच्या स्थलांतरित कुटुंबातील बालके, गर्भवती महिला, स्तनदा माता आणि

किशोरवयीन मुलींसाठी पोषण व आरोग्यसेवा सुरू.

– गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानाला गती.

– व्हीजी-जी राम जी योजनेतील कामांच्या प्रकारांची संख्या ३१८ वरून ३७५ पर्यंत वाढवून स्थानिक गरजांनुसार

कामे निवडण्याची सुविधा.

– चारा लागवडीच्या माध्यमातून ग्रामीण मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासह पशुधनासाठी हिरव्या

चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यावर भर.

शेतीच्या बांधावर पोहोचले कृतिशील नेतृत्व

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242

मास्टर मरीन मेहर यार्ड कंपनीविरोधात गेट बंद आंदोलन सुरू!

तालुका प्रतिनिधी/विठ्ठल ममताबादे

उरण : उरण तालुक्यातील खोपटे येथील मास्टर मरीन मेहर यार्ड कंपनीविरोधात स्थानिक बेरोजगारांना रोजगार मिळावा आणि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना रोजगार व व्यवसायाच्या संधीमध्ये सामावून घ्यावे, या प्रमुख मागण्यांसाठी गुरुवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून गेट बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. स्थानिक बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकरी व कंपनी प्रशासन यांच्यात दि २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता कंपनी मध्ये महत्वाची बैठक संपन्न झाली या बैठकीत सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे,शिवसेना नेते बी एन डाकी, भाजपा युवा नेते प्रशांत ठाकूर,पंचायत समिती सदस्य कविता रुपेश पाटील,कामगार नेते रवि घरत,विविध उपस्थित मान्यवर, मोठेखार (वरचा भाग)प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटना खोपटे बांधपाडाचे पदाधिकारी यांनी बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची बाजू आक्रमकपणे मांडली. स्थानिक बेरोजगार शेतकऱ्यांना न्याय मिळाले पाहिजे. १९ बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कामावर त्वरित रुजू करून घ्यावे अशी मागणी केली. यावेळी मास्टर मरीन मेहर यार्ड कंपनीचे अधिकारी तसेच ठेकेदार उपस्थित होते. कंपनी प्रशासनाने सध्या १० माणसे कामावर घेऊ व नंतर ३ महिन्यांनी ९ माणसे कामावर घेऊ असे वचन दिले. मात्र हा निर्णय बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मान्य नसल्याने त्यांच्यातर्फे उपस्थित शिष्ट मंडळाने सर्वच्या सर्व १९ जणांना एकदाच एकाच वेळी कामावर घ्या. टप्प्या टप्प्या ने नको एकदाच सर्व १९ बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कामावर घ्या अशी आक्रमक भूमिका घेतली. मात्र कंपनी प्रशासनाने ही बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची मागणी अमान्य केली. त्यामुळे आक्रमक होत बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी व आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे व पाटीबांदेपणासाठी उपस्थित असलेले सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, सर्वच पक्षाचे कार्यकर्ते यांनी मुजोर मनमानी करणाऱ्या कंपनी प्रशासनाचा व बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या नोकर भरतीला विरोध करणाऱ्या ठेकेदारांचा निषेध व्यक्त करत कंपनीच्या गेट समोरच बेमुदत आंदोलन करण्याचा निर्णय घेतला.



दि २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता मिटिंग मध्ये अनेक विषयावर सविस्तर चर्चा झाली. मात्र चर्चा निष्फळ झाल्याचे समजताच बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी व सर्वच राजकीय पक्षाच्या नेते, पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली.आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी कंपनी प्रशासनाकडून मागण्या मान्य करण्यात न आल्याने आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय आंदोलकांनी घेतला आहे. मोठेखार (वरचा भाग) प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटना, खोपटे-बांधपाडा यांच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते अजित कृष्णा म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. स्थानिक नागरिक आणि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे कंपनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन छेडण्यात आले आहे.

मेहर यार्ड कंपनीत पेण, अलिबाग, पनवेल तालुक्यातील ७० हुन अधिक माणसे काम करीत आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या कंपनीसाठी संपादित झाल्या त्यांना मात्र कंपनी कामावर घेत नाही. त्यांना नोकरीत रुजू करून घेत नाही. स्थानिक बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोकरीत प्राधान्य देण्या ऐवजी परप्रांतीय व्यक्तींची भरती सुरु आहे. उरण तालुक्यावाहेरील व्यक्ती कंपनीत मोठ्या प्रमाणात काम करत आहेत. त्यामुळे स्थानिक बेरोजगार तरुणांवर, स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर, त्यांच्या कुटुंबियांवर खूप मोठा अन्याय होत आहे. हा अन्याय आम्ही कोणीही सहन करणार नाही. आमच्या मागण्या पूर्ण केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही अशी ठाम व आक्रमक भूमिका शिवसेना नेते बी एन डाकी यांनी मांडली.

कंपनी प्रशासनाकडून मागण्या अमान्य; आंदोलन सुरू ठेवण्याचा आंदोलकांचा निर्णय

स्थानिकांना रोजगार आणि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना संधी देण्याची मागणी; अजित कृष्णा म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन

कंपनीच्या विविध प्रकल्पांमध्ये स्थानिक कामगारांना प्राधान्य देण्यात यावे. लोकल लेबर, सर्व्हेअर, हाऊसकीपिंग तसेच इतर कामांसाठी स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, अशी आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. परिसरातील तरुणांना रोजगारासाठी बाहेर भटकंती करावी लागत असताना स्थानिक भागातील कंपन्यांमध्ये त्यांना प्राधान्य मिळावे, अशी भूमिका आंदोलनाचे नेतृत्व करणारे सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे यांनी मांडली. जोपर्यंत सर्व मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत सदर आंदोलन असेच सुरु राहील.

मुजोर कंपनी प्रशासनाला व मुजोर ठेकेदारांना धडा शिकविल्याशिवाय गप्प बसणार नाही. शासनाचा निर्णय (GR) असताना सुद्धा शासन निर्णय (GR) चे मुजोर कंपनी व मुजोर ठेकेदारांनी उल्लंघन केले आहे. त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजे. स्थानिक प्रकल्पग्रस्त बेरोजगार शेतकऱ्यांना न्याय मिळालेच पाहिजे अशी भूमिका आपल्या भाषणातून अजित म्हात्रे यांनी मांडली.

कंपनीमध्ये उपलब्ध होणाऱ्या रोजगार आणि व्यवसायाच्या संधीमध्ये ७/१२ धारक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य स्थान देण्यात यावे. प्रकल्पग्रस्त प्रभावित झालेल्या शेतकरी कुटुंबांना रोजगार आणि व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य मिळावे, अशी आंदोलकांची अपेक्षा आहे. ही मागणी रास्त असून बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी, भाजपा युवा नेते प्रशांत ठाकूर, शिवसेना नेते बी एन डाकी,पंचायत समिती सदस्य दिपक भोईर, पंचायत समिती सदस्य कविता रुपेश पाटील,कामगार नेते रवि घरत, मनसेचे तालुका अध्यक्ष सत्यवान भगत, सभापती रजेंद्र म्हात्रे, पोलीस पाटील रंगनाथ पाटील, माजी सरपंच विशाखा ठाकूर, माजी सरपंच प्रीती पाटील, माजी सदस्य अविनाश ठाकूर, भाजपा नेते किरण म्हात्रे ,माजी सदस्य विश्वास पाटील, उद्योजक देवेंद्र पाटील, ग्रामस्थ मंडळाचे सचिव कुमार ठाकूर, ग्रामस्थ मंडळाचे उपाध्यक्ष अलंकार पाटील, मनसेचे विभाग अध्यक्ष बबन ठाकूर, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष संतोष पाटील उपस्थित होते.

रांजणगाव विविध विकास सोसायटीच्या अध्यक्षपदी सुनिल पांडुरंग खेडकर यांची निवड



प्रतिनिधी / बाळासाहेब कुंभार

रांजणगाव गणपती: आज संकष्टी चतुर्थी दि. २९ ऑक्टोबर ला रांजणगाव गणपती विविध विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन पदी सुनील पांडुरंग खेडकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली असल्याची माहिती सोसायटीच्या सचिव आरती शेळके-गोरे यांनी दिली.

मावळते चेअरमन सतिश फक्कड शेळके यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर चेअरमन पदी सुनील खेडकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

अध्यक्ष या पदाच्या निवडीकरीता श्री. पी. व्ही. हराळ, अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वार गुरुवार, दिनांक २९/१०/२०२६ रोजी सकाळी १०:०० वा. संस्था कार्यालय रांजणगाव गणपती, ता. शिरुर, जि. पुणे या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी सर्व संचालक पदाधिकारी निवडीच्या सभेस उपस्थित होते . याप्रसंगी सोसायटीचे व्हा.चेअरमन विलास चांगदेव पंचमुख ,माजी पं.स. सदस्य विक्रम पाचुंदकर, महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हा उपाध्यक्ष मेहबूब सय्यद, माणिक खेडकर, हर्षल गदादे, आत्माराम खेडकर आनंदा खेडकर, श्रीराम खेडकर, ॲड.अतुल खेडकर, ,ॲड. आदित्य मैड,रवि लेंडेमार्केट सचिव मैड साहेब, बाळासाहेब फंड (दाजी), संजय खेडकर ,अनिताखेडकर(पीआय),

सुखदेव भुजबळ, रवींद्र बने ,तसेच युवा सेनेचे जिल्हाप्रमुख व सोसायटीचे माजी चेअरमन बापूसाहेब शिंदे,उत्तम तुकाराम कुटे,फक्कड यशवंत धुमाळ,राजेश दत्तु लांडे,गोरक्ष गणपत गदादे ,कैलास सावळेराम लांडे,विष्णु भाऊसाहेब साळुंके,सुनिता शिवाजी देवकर,संगिता गणेश लांडे ,सतिष फक्कड शेळके, महेश निवृत्ती फंड.यांसह विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बालसुरक्षेचा जागर, सुरक्षित बचपन अभियान गंगाबाई शाळेत संपन्न

न्यायाधीश के. एस. खंडारे; कंधार येथे 'सुरक्षित बचपन अभियान' व पोक्सो कायद्याबाबत जनजागृती

कंधार। संतोष कांबळे

मुलांचे संरक्षण ही केवळ पालकांची किंवा शिक्षकांची जबाबदारी नसून ती संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. बालकांना लैंगिक अपराधांपासून संरक्षण देणाऱ्या 'पोक्सो' कायद्याबाबत जनजागृती करणे, मुलांना स्वतःच्या सुरक्षिततेची जाणीव करून देणे आणि अडचणीच्या प्रसंगी विश्वासू व्यक्तींची मदत घेण्याचे धैर्य त्यांच्यात निर्माण करणे, हा 'सुरक्षित बचपन अभियानाचा' प्रमुख उद्देश आहे. जागरूकता, सुरक्षितता आणि संरक्षण हा प्रत्येक बालकाचा अधिकार आहे, असे प्रतिपादन दिवाणी-न्यायाधीश कनिष्ठस्तर तथा न्याय दंडाधिकारी प्रथमवर्ग के. एस. खंडारे यांनी केले.



राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्या निर्देशानुसार तालुका विधी सेवा समिती व अभिवक्ता संघाच्यावतीने येथील महात्मा फुले ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ शेकापूर द्वारा संचलित, श्रीमती गंगाबाई बालक मंदिर व प्राथमिक शाळा स्वप्नभूमीनगर येथे गुरुवार २९ ऑक्टोबर रोजी 'सुरक्षित बचपन अभियान' आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (पोक्सो कायदा) या विषयावर आयोजित शालेय जनजागृती शिबिरात ते बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कंधार अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ?ड.बी.के. पांचाळ, ?ड.अभय देशपांडे, ?ड.स्नेहा देशपांडे, ?ड. हफीज घडीवाला यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक हाजी मोहम्मद अन्सारोद्दीन यांची उपस्थिती होती.

न्यायाधीश खंडारे पुढे म्हणाले की, बालकांवरील अत्याचाराच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होणे ही चिंतेची बाब आहे. फक्त मुलीवरच अत्याचार होत नसून मुलांच्या बाबतीतही अशा घटना घडत आहेत. ही बाब सर्वांनी समजून घेणे गरजेचे आहे. शाळेत येणाऱ्या मुलांकडे शिक्षकांनी बारकाईने लक्ष द्यावे. मुले त्यांच्यावर ओढवलेल्या प्रसंगाची कुठेच वाच्यता करीत नाहीत. ते घाबरलेले असतात. त्याची मानसिकता समजून त्यांना बोलते करण्याची गरज असल्याचेही न्यायाधीश खंडारे यांनी सांगितले. ॲड.ए.एल. देशपांडे, ॲड.स्नेहा देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बालकांचे हक्क, त्यांची सुरक्षितता, लैंगिक अत्याचारापासून संरक्षण, गुड टच, बॅड टच आणि अशा प्रसंगी मदत मागण्याचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले.

प्रथम शिक्षणप्रक्रांतीचे ज्योतपेटवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी न्यायालयातील कर्मचारी श्री शिंदगीकर, श्री गिरी यांच्यासह शाळेतील सहशिक्षका सौ.एम.एस.केंद्रे, सौ.एस.जी. शेंडगे, सौ.पी.एस.केंद्रे, सहशिक्षक एस.एस.राठोड, एम.आर गोटमवाड, एस.एस.गायकवाड, सौ.एन.एम. गाडेकर यांच्यासह आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक संतोष कांबळे यांनी तर आभार प्रवीणकुमार मंगनाळे यांनी मांडले.यावेळी शाळेत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारी 'युनिटी मॅरेथॉन रन'

खापरखेडा पोलीस स्टेशनचे सुंदर आयोजन

खापरखेडा/ दिलीप येवले

देशाचे पहिले गृहमंत्री, उप पंतप्रधान, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या

जयंतीनिमित्त खापरखेडा पोलीसांच्या वतीने 'युनिटी रन मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.०० वाजता खापरखेडा पोलीस स्टेशन येथून करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने खापरखेडा पोलीसव्दारा 'युनिटी मॅरेथॉन रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांच्या या स्पर्धेतील सहभागातून राष्ट्रीय एकतेचा संदेश देणे हा यामागील उद्देश असून, मोठ्या संख्येने नागरिकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा, तसेच राष्ट्रीय एकतेच्या कार्यात सहभागी व्हावे राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने आयोजित या 'युनिटी मॅरेथॉन'मध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. धावण्याच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देतानाच राष्ट्रीय एकता, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याची भावना अधिक दृढ करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा. कुटुंबीय, मित्रमंडळी तसेच विविध संस्था व संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून 'युनिटी मॅरेथॉन'ला यशस्वी करावे, असे आवाहन खापरखेडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांनी केले आहे.

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत डुमरी पुलाजवळ झालेल्या खाजगी बसच्या अपघातप्रकरणी ब्रिजचे बांधकाम करणाऱ्या कंपनीचे मालक, प्रोजेक्ट डायरेक्टर व साईट इंजिनिअर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नागपूर / दिलीप येवले

दिनांक २८/१०/२०२६ रोजी मौजा डुमरी पुलिया, मनसर ते कन्हानकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील फ्लायओव्हर ब्रिजच्या बांधकामालगत खाजगी बसचा गंभीर अपघात झाला. एम एच २७ बी एक्स ६५२१ क्रमांकाची बस बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी सुमारे ४ फूट खोल खड्ड्यात पडली. सदर अपघाताची माहिती डायल ११२ वरून कन्हान पोलीसांना प्राप्त झाली. माहिती मिळताच कन्हान पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचले अपघाताची गंभीरता लक्षात घेऊन मदत यंत्रणा ही बस जबलपुर ही सिवणी मार्गे नागपुर कडे येत असतांना पाहटे ०४/०० वाजेच्या सुमारास मौजा डुमरी पुलिया, मनसर ते कन्हानकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ वरील फ्लायओव्हर ब्रिजच्या बांधकामालगत चालकाच्या ताब्यातील वाहन अनियंत्रित होवुन बस पलटी झाल्याने सुमारे ४ फूट खोल खड्ड्यात पडली. सदर अपघाताची माहीती डायल ११२ वरून कन्हान पोलीसांना प्राप्त झाली. माहिती मिळताच कन्हान पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचले अपघाताची गंभीरता लक्षात घेऊन मदत यंत्रणा तात्काळ बोलवण्यात आल्या. स्थानिक दक्ष नागरिकांच्या मदतीने बस मध्ये अडकलेल्या सर्व प्रवशांना बाहेर काढले. जखमींना तातडीने रुग्णवाहिकेच्या मदतीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्याची व्यवस्था केली. जखमींना पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर अपघाताच्या ठिकाणी सुनील कुमार यादव, वय ४० वर्षे, रा. खुर्शीपार, लखनादौन, जि. सिवनी, मध्य प्रदेश. याचा मृत्यू झाला. १० प्रवासी किरकोळ / गंभीर जखमी झाले आहे.

बस चालकाने अनियंत्रितपणे वाहन चालविल्याने तसेच सदर ठिकाणी फ्लायओव्हर ब्रिजचे बांधकाम सुरू असताना आवश्यक सुरक्षा उपाययोजना, वाहतुकीसाठी सुरक्षित व्यवस्था तसेच सुरक्षेच्या मानकांचे पालन करण्यात आले नसल्याने सदर अपघात झाल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आले.

सदर प्रकरणी बस चालक तसेच फ्लायओव्हर ब्रिजचे बांधकाम करणारी ग्रे इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मालक विनयकुमार आशोककुमार अग्रवाल, रा. व्हिआयपी पुरम कॉलनी, जीत पेट्रोलपंपच्या मागे, ग्वाल्हेर रोड, सेवला जाट, आग्रा, उत्तरप्रदेश, प्रोजेक्ट डायरेक्टर भवनीत सिंग, रा. नागपुर व साईट इंजिनिअर तरुण कुमार, रा. नागपुर यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे भारतीय न्याय संहिता कलम १०६(१), १२५ (अ), १२५ (बी), २८५, २८१, ३(५) सह कलम मोटार वाहन अधिनियमातील कलम १९८अ(२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहेत

संकष्ट चतुर्थी निमित्त श्री महागणपती मंदिरात फुलांची आकर्षक सजावट



प्रतिनिधी : बाळासाहेब कुंभार

रांजणगाव गणपती : आज संकष्टी चतुर्थी निमित्त पहाटे ५ वाजता श्रींचा अभिषेक करून मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. तसेच आज संकष्टी चतुर्थी श्री क्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्ट अयोजनाने सामूहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

संकष्टी चतुर्थी निमित्त भाविकांसाठी उत्तम प्रकारे जलद दर्शन व्यवस्था, पिण्याचे पाणी, खिचडी प्रसाद इत्यादी सुविधा देवस्थान ट्रस्ट तर्फे देण्यात आल्या अशी माहिती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. स्वातीताई दत्तात्रय पाचुंदकर पाटील यांनी सांगितले.

संकष्टी चतुर्थी निमित्त दुपारी १२ वाजता देवस्थान ट्रस्ट मुख्यविश्वस्त ओमकार देव यांच्या हस्ते महापूजा व महानैवेद्य करण्यात आला. तसेच प्रगतशील शेतकरी श्री नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर पाटील यांच्या वतीने मंदिर परिसरात व मंदिर गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली. श्री महागणपती भजनी मंडळ, रांजणगाव गणपती यांचा भजनाचा कार्यक्रम झाला.

यावेळी देवस्थान चे विश्वस्त मंडळ मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव, अध्यक्षा सौ. स्वातीताई पाचुंदकर पाटील, उपाध्यक्ष श्री. संदिप दौडकर, सचिव डॉ. तुषार खिचडी प्रसाद इत्यादी सुविधा, खजिनदार विजय देव, देवस्थान ट्रस्ट तर्फे देण्यात आल्या देवस्थान दत्तात्रेय पाचुंदकर पाटील, व्यवस्थापक बाळासाहेब गोन्हे, पांडुरंग चोरगे, हिशोबणीस संतोष रणपिसे, जनसंपर्क अधिकारी रमाकांत शेळके तसेच देवस्थान कर्मचारी, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या कुस्तीची समृद्ध परंपरा नव्या पिढीने पुढे नेण्याची गरज : नंदकुमार निकम

चार विभागांतील १६० मल्लांचा सहभाग; महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ यांची उपस्थितीद्यालयात आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेचा थरार

पुणे (शिरूर) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे चांदमल तारायंद बोरा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुलांच्या आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या जिमखाना विभागात करण्यात आले. पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहिल्यानगर आणि नाशिक या चार विभागांतील तब्बल १६० मल्लांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. श्री. नंदकुमार निकम यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना नंदकुमार निकम यांनी महाराष्ट्राच्या कुस्तीला समृद्ध परंपरा लाभली असून, ही परंपरा नव्या पिढीने पुढे नेण्याची गरज असल्याचे सांगितले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची क्रीडाक्षेत्रातील यशस्वी परंपरा कायम राखण्याचे आवाहन त्यांनी खेळाडूंना केले. पंचांनी निष्पक्षपणे निर्णय देत स्पर्धेची गुणवत्ता आणि विश्वासार्हता कायम ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. नवोदित खेळाडूंनी अनुभवी मल्लांकडून मार्गदर्शन घेत आपल्या कौशल्यात सातत्याने सुधारणा करावी, असेही त्यांनी नमूद केले.



अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते यांनी महाविद्यालयाच्या विविध क्षेत्रांतील उपक्रमांचा व कामगिरीचा आढावा घेतला. कुस्ती हा शिस्त, संयम, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावावर आधारित खेळ असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील मल्लांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली असून देशाचे नाव उज्वल केले आहे असे सांगितले. आज होणाऱ्या स्पर्धेमध्ये सर्व खेळाडूंनी खिलाडूवृत्तीने सहभागी होऊन आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच महाविद्यालयाने स्पर्धेसाठी उपलब्ध करून दिलेल्या सोयी-सुविधांचा वापर करताना काही कमतरता जाणवल्यास त्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात, असेही त्यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सहायक क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके यांनी स्पर्धेचे नियम व अटी स्पष्ट करून खेळाडूंना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभागाचे समन्वयक डॉ. डी. एच. बोबडे यांनी केले व त्यामध्ये त्यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका मांडली व सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

या वेळी व्यासपीठावर महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज मोहोळ, आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक डॉ. संतोष भुजबळ, आंतरराष्ट्रीय पंच श्री. दिनेश गुंड, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एच. एस. जाधव, विज्ञान विभागप्रमुख प्रो. डॉ. घनगावकर, प्रा. गणेश गव्हाणे, प्राध्यापक, शिक्षक, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, निमंत्रित समिती सदस्य, मार्गदर्शक तसेच विविध महाविद्यालयांतील खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मंजुषा पाटील यांनी केले. शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. आप्पासाहेब चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात अभिजीत वंजारी विजयी



नागपूर : नागपूर विभाग विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत इंडियन नॅशनल काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी यांनी विजय मिळविला. त्यांना प्रथम व द्वितीय पसंतीक्रमाची एकूण ६७ हजार २३१ मते मिळाली. तर त्यांचे निजाकचे प्रतिस्पर्धी भारतीय जनता पार्टीचे सुधाकर कोहळे यांना ६३ हजार ९६० मते मिळाली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी अभिजित वंजारी यांना विजयाचे प्रमाणपत्र प्रदान केले.

नागपूरच्या मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता ८४ टेबलवरून मतमोजणीला सुरुवात झाली. ४१ पेक्षा जास्त तासांपासून ही मतमोजणी सुरू होती. यावेळी निवडणूक निरीक्षक डॉ.हर्षदीप कांबळे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, विभागातील सर्व जिल्ह्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पहिल्या पसंतीच्या दोन फेऱ्यांमध्ये कोणत्याही उमेदवाराला विजयासाठी आवश्यक ७५ हजार ४३८ मतांचा कोटा पूर्ण करता आला नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेनुसार द्वितीय पसंतीक्रमाची बाद फेरी घेण्यात आली. पहिल्या पसंतीच्या दोन फेऱ्यांमध्ये १ लाख ६५ हजार ९०६ मतांपैकी १५ हजार ३२ मते अवैध ठरली. तर १ लाख ५० हजार ८७४ मते वैध ठरली.

द्वितीय पसंतीच्या बाद फेऱ्यामध्येही कुठल्याही उमेदवाराला निर्धारित कोटा पूर्ण करता आला नाही. त्यामुळे पहिल्या व द्वितीय पसंतीक्रमाच्या बाद फेरी मिळून सर्वाधिक ६७ हजार २३१ मते घेणाऱ्या अभिजित वंजारी यांना विजयी घोषीत करण्यात आले.

भारत निवडणूक आयोगाने नागपूर विभाग विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम २२ सप्टेंबर रोजी जाहीर केला होता. त्यानुसार २९ सप्टेंबर रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. २३ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे वेळापत्रक आयोगाने निश्चित केले आहे.

नागपूर महानगरपालिकेतर्फे राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा



नागपूर/दिलीप वेवले

नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त आज गांधीनगर येथील वाल्मिकी हिंदी माध्यमिक शाळेत जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. यावेळी शाळेतील मुला-मुलींना जंतनाशक गोळ्यांचे वाटप करून जंतसंसर्ग प्रतिबंधाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

राष्ट्रीय जंतनाशक दिनाच्या अनुषंगाने १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळ्या देण्याच्या उपक्रमाची माहिती देण्यात आली. जंतसंसर्गामुळे बालकांमध्ये कुपोषण व रक्तक्षय होण्याचा धोका असतो. तसेच यामुळे मुलांच्या शारीरिक वाढीवर, मानसिक विकासावर आणि शैक्षणिक प्रगतीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मुलांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी जंतसंसर्ग प्रतिबंधाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

राष्ट्रीय जंतनाशक दिनहा बालकांचे आरोग्य, पोषणस्थिती आणि सर्वांगीण विकास सुधारण्याच्या उद्देशाने राबविण्यात येतो. या उपक्रमांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये जंतनाशक दिन साजरा करण्यात आला.तसेच ळढ्ढ द्वारे शाळेळा गोळ्यां पुरविण्यात आल्या. शाळा व अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून १ ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना जंतनाशक गोळ्या निःशुल्क दिल्या जातात. नोंदणी न झालेल्या तसेच शाळेबाहेरील मुला-मुलींनाही अंगणवाडी स्तरावर गोळ्या देण्याची व्यवस्था करण्यात येते.

हा उपक्रम महापौर श्रीमती. निता ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आयुक्त डॉ. विपीन,मा. अतिरिक्त आयुक्त श्री अंकित, श्री. मुरुगानंथम एम. यांच्या देखरेखीत आयोजित करण्यात आला.

यावेळी मुंबईचे उपसंचालक डॉ. सचिन तडस यांनी विद्यार्थ्यांना जंतसंसर्ग प्रतिबंधाचे महत्त्व सांगितले. नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनीअल्बेंडाझोल (ऍंहैंद्रत) या जंतनाशक गोळीचे महत्त्व आणि बालकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यातील तिची भूमिका याबाबत माहिती दिली तसेच जंतसंसर्गामुळे मुलांच्या शारीरिक वाढीवर, मानसिक विकासावर आणि शैक्षणिकप्रगतीवर होणाऱ्या संभाव्य परिणामांबाबत मार्गदर्शन केले.

ज्या मुला-मुलींना २७ ऑक्टोबर २०२६ रोजी जंतनाशक गोळी मिळालीं नसेल, त्यांच्यासाठी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी ंॉप-अप दिन आयोजित करण्यात आला आहे. या दिवशी संबंधित मुलांना जंतनाशक गोळी देण्याबाबत पालकांनी जागरूक राहावे असे आवाहन करण्यात आले.

वाल्मिकी हिंदी माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळ्यांचे वाटप; जंतसंसर्ग प्रतिबंधाबाबत जनजागृती

कोजागिरी स्नेहमिलन व श्रीमंत यशवंतराव होळकर पुण्यतिथी कार्यक्रम उत्साहात संपन्न



नागपूर/ दिलीप वेवले

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समिती, सौभाग्य नगर, नागपूर यांच्या वतीने बुधवार, दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी अहिल्या मंदिर येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त स्नेहमिलन व सुरुची भोजनाचा कार्यक्रम तसेच महान मराठा सरदार, लोकनायक श्रीमंत यशवंतराव होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला सुमारे १५० ते २०० समाजबांधवांनी उपस्थित राहून स्नेहमिलनाचा आनंद घेतला.

कोजागिरी पौर्णिमेच्या मंगलमय वातावरणात आयोजित या कार्यक्रमातून समाजातील एकोपा, बंधुभाव, परस्पर सहकार्य आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. उपस्थित समाजबांधवांनी एकत्र येत आपुलकीच्या वातावरणात संवाद साधला. दुधाचा प्रसाद आणि सुरुची भोजनाचा आस्वाद घेत सर्वांनी या स्नेहमिलनाचा आनंद लुटला.श्रीमंत यशवंतराव होळकर यांच्या कार्याला

१५० ते २०० समाजबांधवांची उपस्थिती; आरोग्य व समाजसेवेतील ३१ वर्षांच्या योगदानाबद्दल वंदना बर्डे यांचा गौरव

अभिवादन कार्यक्रमात महान मराठा सरदार व लोकनायक श्रीमंत यशवंतराव होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या शौर्य, पराक्रम, नेतृत्वगुण आणि ऐतिहासिक कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या कर्तृत्वातून प्रेरणा घेऊन समाजाने संघटितपणे प्रगती साधावी, तसेच त्यांच्या ऐतिहासिक वारशाची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

आरोग्य व समाजसेवेतील ३१ वर्षांच्या योगदानाबद्दल वंदना बर्डे यांचा सन्मान

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे जिल्हा रुग्णालयातील अधिसेविका व सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती वंदना विनोद बर्डे यांचा करण्यात आलेला गौरव.आरोग्यसेवा आणि समाजसेवेच्या क्षेत्रात तब्बल ३१ वर्षे उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल त्यांना 'युनिव्हर्सल ऑनररी अवॉर्ड कॉन्सिल'तर्फे मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या गौरवपूर्ण यशाबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समितीच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

समितीचे कार्याध्यक्ष श्री. रमेशजी डवळे आणि सचिव श्री. महादेवजी पातोड यांच्या हस्ते श्रीमती वंदना बर्डे यांचा सन्मान करून त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचे कौतुक करण्यात आले. आरोग्यसेवेच्या माध्यमातून रुग्णांची सेवा आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून गरजू व्यक्तींना मदत करण्याचे त्यांचे योगदान समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.वंदना बर्डे यांना प्राप्त झालेली मानद डॉक्टरेट पदवी ही त्यांच्या आरोग्य व समाजसेवेतील कार्याचा गौरव असल्याचे नमूद करून उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सामाजिक एकजुटीचा प्रेरणादायी उपक्रम

कोजागिरी पौर्णिमेचा आनंद, ऐतिहासिक महापुरुषांच्या कार्याचे स्मरण आणि समाजसाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान अशा त्रिवेणी संगमामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. सुमारे १५० ते २०० समाजबांधवांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अशा स्नेहमिलनाच्या कार्यक्रमांमुळे समाजातील परस्पर संबंध अधिक दृढ होतात, सामाजिक कार्याला चालना मिळते आणि नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण होतात. कार्यक्रमाचे आयोजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समिती, सौभाग्य नगर, नागपूर यांच्या वतीने करण्यात आले.

केंद्रीय संचार ब्युरो नागपूर यांच्या वतीने शालेय स्तरावरील उपक्रमांसह दक्षता जागृती सप्ताह साजरा

काटोल रोड येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील मुलांनी घेतली शपथ; चित्रकला आणि निबंध स्पर्धाही आयोजित



नागपूर/दिलीप वेवले

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत,नागपूर येथील केंद्रीय संचार ब्युरो (ऍंध), क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने, दक्षता जागृती सप्ताह २०२६ चा भाग म्हणून २९ ऑक्टोबर रोजी नागपूर येथील कटोल रोडवरील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत एक जनजागृती कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात सचोटी, प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांच्या महत्त्वाबाबत संवेदनशील करणे हा होता.

नागपूर येथील सीबीसी क्षेत्रीय कार्यालयाचे प्रसिद्धी सहाय्यक शुभम गुडाघे यांनी उपस्थित विद्यार्थी आणि शिक्षकांना शपथ देऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. विद्यार्थ्यांना दक्षता आणि नैतिक आचरणाविषयीची त्यांची समज व्यक्त करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी चित्रकला आणि निबंध-लेखन स्पर्धांचेही यावेळी आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमधील कामगिरीची दखल घेऊन विजेत्यांना बक्षिसे वितरित करण्यात आली. शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक कार्यालयांमध्ये दक्षता आणि सचोटीचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये सहभाग घेतला, तसेच शिक्षक आणि शाळेतील कर्मचाऱ्यांही या कार्यक्रमात सामील झाले. या उपक्रमाद्वारे, सीबीसी नागपूरने विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजवण्याचा आणि त्यांना दैनंदिन जीवनात प्रामाणिकपणा व जबाबदारीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाद्वारे लहानपणापासूनच ही मूल्ये जोपासण्याचे आणि विद्यार्थी, शिक्षक व अधिकारी यांच्या सामूहिक सहभागातून उत्तरदायित्व वाढवण्याचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.


सणोत्सवांच्या काळात ध्वनी व पर्यावरण प्रदूषण रोखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांकडून व्यापक जनजागृती

नागपूर/दिलीप वेवले

हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्ह्यात नागरिकांमध्ये म्युझीक सिस्टीम, ॲम्प्लीफायर इतर वादये व फटाक्यांच्या वापरामुळे होणारे ध्वनी व पर्यावरण प्रदूषण याबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली आहे.

सदर जनजागृती कार्यक्रमाध्ये शाळा व महाविद्यालयांमध्ये विशेष सत्रांचे आयोजन करून म्युझीक सिस्टीम, ॲम्प्लीफायर इतर वादये व फटाक्यांमुळे होणारे वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण यांचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले आहे. तसेच पोलीस पाटील आणि स्थानिक व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. बीट अधिकारी व अंमलदार यांच्यामार्फत गावागावांत, बाजारपेठांमध्ये, गर्दीच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक ठिकाणी ध्वनी प्रदूषणाबाबत जनजागृती करण्यात आली आहे. यासोबतच नियमांचे पालन करण्याचे आवाहन करणारे संदेश प्रदर्शित करून नागरिकांना ध्वनी प्रदूषणाचे दुष्परिणाम व त्यावरील कायदेशीर तरतुदींची माहिती देण्यात आली.म्युझीक सिस्टीम, ॲम्प्लीफायर इतर वादये व फटाक्यांच्या वापरामुळे होणारे ध्वनी व वायू प्रदूषणाचे गंभीर दुष्परिणाम असुन फटाके फोडताना होणारा मोठा आवाज आणि धूर आपल्या, इतरांच्या व पर्यावरणाच्या आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. मोठा आवाज कानाच्या स्नायूंना नुकसान पोहोचवतो व ऐकण्याची क्षमता कमी होऊ शकते.

विद्यापीठ विभागांचे रँकिंग फ्रेमवर्कसह शैक्षणिक आणि प्रशासकीय मूल्यमापन



नागपूर/दिलीप वेवले

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने आपल्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या (IQAC) माध्यमातून विद्यापीठ विभागांचे रँकिंग फ्रेमवर्क (UDRF) तसेच शैक्षणिक आणि प्रशासकीय मूल्यमापन (AAA) केले. विविध विभागात गंगळवार, दि. २७ व बुधवार, दि.२८ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतर्गत मूल्यमापनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

अंतर्गत मूल्यमापन उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माननीय कुलगुरू डॉ. मनाली एम. क्षीरसागर, मा. प्र-कुलगुरू डॉ. अखिलेश पेशवे, कुलसचिव डॉ. विजय खंडाळ यांचे मार्गदर्शन, नेतृत्व आणि प्रोत्साहन लाभले. या मूल्यांकन प्रक्रिया उपक्रमाचे अध्यक्षस्थान पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन आर. करमळकर यांनी भूषविले. बाह्य तज्ज्ञ समितीमध्ये कोलकाता येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (ध्घ्ऍै) रासायनिक विज्ञान विभागातील डॉ. सजिओ झाडे, सीएसआयआर-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (ऍंध्ऍ-ग्ग्ध), पुणे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश पी. वडगावकर, हैदराबाद केंद्रीय विद्यापीठ, हैदराबादच्या समाजशास्त्र विभागाचे डॉ. पुष्पेश कुमार, भाषा, साहित्य आणि संस्कृती अध्ययन विद्याशाखेचे वरिष्ठ प्राध्यापक तथा संचालक डॉ. दिलीप वसंतराव चव्हाण, टाटा कन्सल्ट्न्सी सर्व्हिसेस (ऊगए), नागपूरचे केंद्रप्रमुख डॉ. अरविंद कुमार, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती शारीरिक शिक्षण विभागातील प्राध्यापक डॉ. तनुजा राऊत, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातील डॉ. वैशाली प्रफुल्ल गुडधे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सामाजिक शास्त्रे अध्ययनशाळेचे माजी संचालक डॉ. जी. एस. वेळने यांचा समावेश होता. या मूल्यांकनांतर्गत विद्यापीठाच्या एकूण ४० विभागांचा समावेश करण्यात आला. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील ११, मानव विज्ञान विद्याशाखेतील २०, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील २ आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासविद्याशाखा अंतर्गत ७ विभागांचा समावेश होता.या दोन दिवसीय मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान विभागांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील आपल्या शैक्षणिक उपलब्धी, विविध उपक्रम आणि कामगिरीचे सादरीकरण केले. सादरीकरणांसोबत संबंधित कागदपत्रे व पुरावे सादर करण्यात आले. बाह्य तज्ज्ञ, समितीचे अध्यक्ष आणि संबंधित अधिष्ठाता यांनी या पुराव्यांची छाननी करून विभागांच्या कामगिरीचे मूल्यमापन केले तसेच पुढील गुणवत्ता वृद्धीसाठी आवश्यक असलेल्या सुधारणा करण्याच्या संधीबाबत मार्गदर्शन केले. या संपूर्ण उपक्रमाचे समन्वयन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) संचालक डॉ. नंदकिशोर एन. करडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आयक्यूएसी कार्यसंघामध्ये श्रीमती विद्या फाटिंग, श्री. अनिकेत गभणे, श्रीमती शिल्पा करवाडे, श्री. श्रेयश माने आणि कु. अंजली सिंह यांचा समावेश होता. या कार्यसंघाने मूल्यांकनाच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक समन्वय आणि व्यवस्थापनाची जबाबदारी कार्यक्षमतेने पार पाडली. विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये शैक्षणिक गुणवत्तेचे संवर्धन, संस्थात्मक उत्तरदायित्व आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता वृद्धी साध्य करणे हा उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. विद्यापीठाचे नेतृत्व, बाह्य तज्ज्ञ, अधिष्ठाता, विभागांचे प्रतिनिधी आणि आयक्यूएसी कार्यसंघ यांच्या सामूहिक प्रयत्नांतून विद्यापीठाने शैक्षणिक उत्कृष्टता, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता संवर्धनप्रती आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

आविष्कार संशोधनवृत्तीस चालना देणारे व्यासपीठ



-कुलसचिव डॉ. विजय खंडाळ यांचे प्रतिपादन
-आविष्कार- २०२६ नागपूर ग्रामीण जिल्हास्तरीय निवड चाचणीचे देवग्राम येथे आयोजन
-संशोधन, नवकल्पना आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला मिळणार नवी दिशा

नागपूर/दिलीप वेवले

आविष्कार महोत्सव विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीस चालना देणारे व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विजय खंडाळ यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तथा अंत्योदय विज्ञान संस्था व संशोधन केंद्र, देवग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने आविष्कार-२०२६ नागपूर ग्रामीण जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन अंत्योदय विज्ञान संस्था व संशोधन केंद्र देवग्राम येथे बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आले. आविष्कार महोत्सवाचे उद्घाटन करताना डॉ. खंडाळ मार्गदर्शन करीत होते.

माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भिवापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जोबी जार्ज यांनी भूषविले, उद्घाटक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विजय खंडाळ, विद्यापीठाचे नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभाग संचालक डॉ. प्रकाश ईटणकर, विद्यार्थी विकास संचालक डॉ. विजय तांगडे, आविष्कार कार्य समितीचे अध्यक्ष डॉ. संजय ढोबळे, डॉ. सुधीर शेळके, डॉ. निशिकांत राऊत, डॉ. निलेश आवटे, कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष तथा अंत्योदय विज्ञान संस्था व संशोधन केंद्राचे प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे, समन्वयक डॉ. कल्याणी ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि नवकल्पना यांना योग्य व्यासपीठ मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवू शकतात, असे डॉ. विजय खंडाळ यांनी पुढे बोलताना सांगितले. आविष्कार हा केवळ संशोधन प्रकल्पांचा उपक्रम नसून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, वैज्ञानिक दृष्टिकोनाला आणि ज्ञानाधिष्ठित भविष्याला दिशा देणारा महत्त्वपूर्ण विद्यापीठीय उपक्रम असल्याचे उद्घाटनीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जोबी जार्ज यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागताध्यक्षीय भूमिका प्राचार्य डॉ. देवेंद्र भोंगाडे यांनी मांडली. आपल्या स्वागतध्यक्षपर भाषणात डॉ. देवेंद्र भोंगाडे यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक क्षमतेला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याची संधी उपलब्ध करून देणे, हे आविष्कार २०२६ चे प्रमुख वैशिष्ट्य असल्याचे सांगितले. उद्घाटनप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना संशोधनाच्या माध्यमातून समाजातील विविध समस्यांवर उपाय शोधण्याचे आवाहन केले. उच्च शिक्षणामध्ये संशोधन संस्कृती रुजविणे, विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीला चालना देणे, यासाठी आविष्कारसारखे उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमात विशेष उपलब्धी प्राप्त केल्याबद्दल डॉ. जोबी जार्ज यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच डॉ. संजय ढोबळे यांना प्रतिष्ठित सप्तर्षी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विजय खंडाळ यांनाही सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक प्रकल्पांना योग्य दिशा देणे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विद्यापीठीय संशोधनाच्या मुख्य प्रवाहात आणणे, हा आविष्कार उपक्रमाचा महत्त्वपूर्ण हेतू असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, सर्जनशीलता आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला नागपूर ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रणाली इंगोले यांनी केले व समन्वय कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. कल्याणी ठाकरे यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानून उद्घाटनीय सत्राची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्याना एक लाख रुपये मदत देऊन सक्तीची वसुली बंद करा

प्रभा राव विचार मंचाचा जाम चौरस्त्यावर रस्ता रोको : ३७ कार्यकर्ते स्थानबद्ध

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे

समुद्रपूर : युती सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे व यंदा अपुरा पाऊस झाल्याने शेतकरी अस्मानी व सुलतानी अशा दोन्ही संकटात सापडलेला आहे.युती सरकारच्या शेतकरीद्रोही धोरणामुळे शेतकरी दिवसेंदिवस गर्तेत जात असून आत्महत्या करण्याकडे प्रवृत्त होत आहे या धोरणाच्या विरुद्धार्थ आज प्रभाताई विचार मंचाच्या नेत्या चारुताई राव यांच्या सूचनेनुसार मंचचे जिल्हा अध्यक्ष प्रवीण उपासे यांच्या नेतृत्वात जाम चौरस्ता येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी या चौरस्त्याच्या चारही दिशेने मोठया प्रमाणात वाहनांच्या रांगा लागलेल्या होत्या. यावेळी पोलिसांनी कारवाई करून ३६ कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्यानंतर जवळपास एक तासाने हा महामार्ग मोकळा करण्यात आला.

. या रस्ता रोको त जवळपास हजारावर शेतकरी सहभागी होऊन शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध व्यक्त करण्यात आला.

. प्रभाताई राव विचार मंचाचे नेते प्रवीण उपासे यांनी उपस्थित शेतकरी वर्गाला मार्गदर्शन करताना म्हणाले की,शेतकरी वर्ग अपुऱ्या पाऊसामुळे चिंतेत सापडलेला असून वर्धा जिल्ह्यातील ह ? पांढरे सोने सरकारच्या उदासीन धोरणामुळे काळवंडल्या गेलेले आहे. या वर्षीच्या अपुऱ्या पाऊसामुळे तसेच वाढलेले खताचे भाव व महाग बी बियाणे पेरूनही पाऊसाअभावी उगवण क्षमता कमी झाल्याने यंदा सर्वच शेती उत्पादन कमी झालेले आहे.व पाण्या अभावी रब्बी हंगाम होण्याची शक्यता नाही. तसेच सरकारने बोअरिंग व विहिरी खोदण्यावर बंदी घातलेली आहे. हा निर्णय शेतकरी वर्गावर अन्याय करणारा असून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात विहिरी किंवा बोअरिंग खोदण्यास परवानगी देण्यात यावी अशी मागणी केली.



यावेळी सर्वश्री प्रवीण उपासे डॉ रामकृष्ण खूजे गुणवंता कोठेकार रामाजी वाघ प्रशांत गहुकार विजय तडस यांनी मार्गदर्शन केले.

. वक्त्यानी कपाशीला प्रति किंटल १५ हजार रुपये, तसेच विदर्भातील नगदी पिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोयाबीनला प्रति क्विंटल १० हजार रुपये दर देण्यात यावा अशी आमची कळकळीची मागणी केली.आंदोलन कर्त्यांच्या मुख्य मागण्या खालील प्रमाणे आहेत.

१) दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवाना तातडीने एक लाखाची मदत करण्यात यावी.

.२) कापसाला प्रति क्विंटल १५ हजार रुपये भाव देण्यात यावा

३) सोयाबीनला प्रति क्विंटल १० हजार भाव देण्यात यावा.४)कर्जमाफीची रक्कम त्वरित बँकेत जमा करून शेतकरी वर्गाला पुडील हंगामा साठी बँकेमार्फत कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे.

५) पिक विमा योजना त्वरित लागू करण्यात यावी.

६) शेतातील सौर ऊर्जा योजना रद्द करून पूर्ववत विज उपलब्ध करून देण्यात यावी.

७) खाजगी सावकार व फायनान्स कंपनी यांच्या कडून होणाऱ्या कर्ज वसुलीला पायबंद घालण्यात यावा.

८) रासायनिक खताचे भाव रद्द करून खतासाठी ऑनलाईन नोंदणी बंद करावी.

. या आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री,,मनीष साहू निखिल श्रीवास प्रवीण पणत गजानन चोरेकर सुरेश अरांडे अमित मांडवकर महेश नागापुरे पुरुषोत्तम भगत प्रशांत बद्दूले वामन बावणे प्रशांत फोफारे दिलीप डंभारे मिलिंद डफ कमलाकर देशमुख बालू ठाकरे पप्पू साठोणे विशाल काळे नूतन राठोड नाना मानकर तानबाजी वैद्य शाम उईके अवी बंगाले बंटी शेंडे विनोद डंभारे प्रीतम शिंदे यांनी परिश्रम केले.

महात्मा ज्योतिबा फुले महसूल लोक अदालत अभियानाचे १८ नोव्हेंबर, २०२६ रोजी आयोजन

तालुका प्रतिनिधी /अमोल झाडे

समुद्रपूर : नागरिकांच्या महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी तसेच महसूल विषयक सेवा व तक्रारीचे निराकरण करण्याच्या उद्देशाने तहसील कार्यालय, समुद्रपूर येथे बुधवार, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता 'महात्मा ज्योतिबा फुले महसूल लोक अदालत अभियान' आयोजित करण्यात आले आहे.

या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित प्रकरणे व समस्या मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. संबंधित प्रकरणांचे नियमानुसार निराकरण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

तरी समुद्रपूर तालुक्यातील नागरिकांनी महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रकरणे, अर्ज व तक्रारी असल्यास आवश्यक कागदपत्रांसह सदर अभियानात उपस्थित राहावे व या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार कपिल हाटकर , समुद्रपूर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

कारंजा घाडगे येथे महाविकास आघाडीचा जल्लोष

आमदार अभिजित वंजारी यांच्या विजयानंतर खा. अमर काळे आणि जयकुमार बेलखडे यांच्या उपस्थितीत विजयोत्सव



कारंजा (घाडगे):पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत आमदार अभिजित वंजारी यांच्या दणदणीत विजयाचे पडसाद कारंजा घाडगे येथे जोरदारपणे उमटले आहेत. या विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी आज कारंजा घाडगे येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात तसेच गोळीबार चौक परिसरामध्ये महाविकास आघाडीच्या वतीने भव्य विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे आणि जयकुमार बेलखडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजी आणि गुलाल उधळत आनंद व्यक्त केला. ?आमदार अभिजित वंजारी यांच्या विजयाने महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला आहे. कारंजा घाडगे कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच गोळीबार चौक येथील उड्डाणपुलाखाली जोरदार आतषबाजी करत आणि एकमेकांना गुलाल उधळून हा विजयोत्सव साजरा करण्यात आला. फटाक्यांच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाने व कार्यकर्त्यांच्या उत्साहाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या महाविकास आघाडीच्या घटक पक्षांचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांना पेढे भरवून विजयाचा आनंद साजरा केला.

याप्रसंगी बोलताना खासदार अमर काळे म्हणाले की, 'हा विजय पदवीधरांनी महाविकास आघाडीच्या जनहितैषी धोरणांवर आणि अभिजित वंजारी यांच्या कार्यक्षम नेतृत्वावर दाखवलेल्या विश्वासाची पोचपावती आहे.' जयकुमार बेलखडे यांनीही कार्यकर्त्यांचे अभिनंदन करत आगामी सर्व निवडणुकांमध्ये हीच विजयी घोडदौड कायम टेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

या विजयोत्सवाला महाविकास आघाडीचे स्थानिक नेते, विविध सेलचे पदाधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, व्यापारी प्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'महाविकास आघाडीचा विजय असो' अशा घोषणांनी संपूर्ण बाजार समिती व गोळीबार चौक परिसर दणाणून गेला होता.

पिंपळगाव (लुटे) येथे वर्षावास समापन दिन उत्साहात

भाषण, गीत, नृत्य स्पर्धेसह पथनाट्यातून सामाजिक प्रबोधन

गौळ : तथागत बुद्ध पंचकमिटी, पिंपळगाव(लुटे) यांचा वतीने बुद्ध विहारात वर्षावास समापन दिनानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला उपासक-उपासिका, महिला, युवक तसेच बालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



वर्षावासाच्या काळात भगवान बुद्धांच्या विचारांचा, धम्माचा आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. त्यानंतर आयोजित समापन कार्यक्रमात विविध मनोरंजक खेळ घेण्यात आले. तसेच भाषण स्पर्धा, गीत स्पर्धा, नृत्य स्पर्धा आणि पथनाट्य सादर करण्यात आले. सहभागी स्पर्धकांनी आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करत उपस्थितांची दाद मिळविली. पथनाट्याच्या माध्यमातून सामाजिक विषयांवर जनजागृती करण्यात आली.छोटे कलाकार तन्मय म्हैसकार, आरुषी म्हैसकार अर्पिता म्हैसकार जानवी कांबळे,शरण्या कांबळे, शौर्य कांबळे, आराध्या कांबळे, शिवन्या नगराळे, दीक्षा नगराळे, आरुषी वैरागडे,यांनी या कार्यक्रमात भाग घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी रमेश धनविज उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कृष्णा भगत, गौतम इहाके, अमोल गायकवाड यांच्यासह चंद्रभान मुन, नीलिमा भिवे, मायाबाई येसनकर, प्रमोद डुकरे, भीमाबाई मुन, वनमाला कांबळे, अर्चना म्हैसकार, संघमित्राबाई भिवे आणि विमलबाई गायकवाड, शालिनीताई पाटील व शुभांगी पाटील यांचा उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणा ओरके, प्रज्ञा कांबळे आणि पुनम म्हैसकार यांनी केले. वर्षावास समापनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमातून बुद्ध, धम्म आणि सामाजिक समतेचा संदेश देत समाजात प्रबोधनाची ज्योत कायम टेवण्याचा संकल्प करण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

नागपूर येथे राष्ट्रीय संगोष्ठी: कॅन्सर केअर थ्रू आयुर्वेद

डॉ. शीतल आसुटकर यांचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गौरव

आरती कारंजेकर

देवळी : शल्यतंत्र विभागातील उल्लेखनीय कार्य, शस्त्रक्रिया क्षेत्रातील योगदान आणि संशोधनपर उपक्रमांची दखल घेत महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालय, सालोड (वर्धा) येथील शल्यतंत्र विभागाच्या प्रमुख डॉ. शीतल आसुटकर यांचा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते नुकताच गौरव करण्यात आला. नागपूर येथे आयोजित 'कॅन्सर केअर थ्रू आयुर्वेद' या राष्ट्रीय संगोष्ठीत श्री आयुर्वेद महाविद्यालयाच्या टीमतर्फे त्यांना उत्कृष्ट प्लेनरी सेशनसाठी हा सन्मान प्रदान



करण्यात आला.

वर्धा येथील अदानी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च अभिमत विद्यापीठ अंतर्गत असलेल्या महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र, सालोड (हिरापूर) येथे डॉ. शीतल आसुटकर या गेल्या २५ वर्षांपासून आयुर्वेदिक शल्यचिकित्सा, रुग्णसेवा आणि संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शल्यतंत्र विभागामार्फत विविध जनरल शस्त्रक्रिया, रुग्णोपयोगी उपक्रम आणि शैक्षणिक कार्यक्रम यशस्वीपणे राबविले जातात.

आयुर्वेदातील पारंपरिक शल्यचिकित्सा ज्ञानाचा आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानासोबत समन्वय साधत रुग्णांना प्रभावी उपचार उपलब्ध करून देण्यात त्यांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. विद्यार्थ्यांना शस्त्रक्रियेचे प्रात्यक्षिक ज्ञान देणे, संशोधनाला प्रोत्साहन देणे आणि आयुर्वेदिक शल्यचिकित्सेची व्याप्ती वाढविण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालेला हा सन्मान डॉ. शीतल आसुटकर यांच्या वैद्यकीय व संशोधनात्मक कार्याची पावती असून, यामुळे आयुर्वेद क्षेत्रातील डॉक्टर आणि विद्यार्थ्यांसाठी एक नवा प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला आहे.

ठाणेदार गजरे यांची पत्रकारांसोबत दिलखुलास चर्चा

आष्टी शहीद : प्रतिनिधी

आष्टी पोलीस ठाण्याचे ठाणेदार देविदास गजरे यांनी आष्टी तालुक्यातील पत्रकारांसोबत दिलखुलास चर्चा केली. यावेळी विविध सामाजिक प्रश्न, कायदा व सुव्यवस्था, नागरिकांच्या समस्या तसेच पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीसंदर्भात चर्चा करण्यात आली.


समाजातील घडामोडी नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात पत्रकारांची भूमिका महत्त्वाची असते. तर नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी पोलीस प्रशासनावर असते. या दोन्ही यंत्रणांमध्ये योग्य समन्वय राहिल्यास सामाजिक प्रश्न सोडविण्यास मदत होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या, गावागावांतील परिस्थिती, वाहतूक व्यवस्था, अवैध धंद्यांवर नियंत्रण आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पत्रकार व पोलीस प्रशासन यांच्यात संवाद असणे आवश्यक असल्यावरही चर्चा झाली.

पत्रकारांनी समाजातील वास्तव परिस्थिती प्रशासनापर्यंत पोहोचवावी, तर पोलिसांनी नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

या दिलखुलास चर्चेमुळे पत्रकार आणि पोलीस प्रशासन यांच्यातील संवाद अधिक दृढ होण्यास मदत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.तत्पूर्वी पत्रकार म्हणून सोनू मार्गे यांनी चालू घडामोडी वर चर्चा करून अवैध धंद्याला आळा घालावा शेतकऱ्यांच्या समस्या वेळीच सोडवाव्या यावर विचार मंथन करण्यात आले.यावेळी आष्टी तालुका पत्रकार स्वरक्षण समिती चे तालुका अध्यक्ष शिवाजी चंदोलकर, क्रांती भूमी पत्रकार संघटना कार्यकारी अध्यक्ष जनार्दन डोक, तालुका अध्यक्ष प्रवीण करोले, उपाध्यक्ष संस्कृत अली, सचिव राहुल गजरे, प्रमोद भोजने, राजू खंडारे, सुयुफ शेख, सुनील मांडवे, समीर पठाण, गोपाल चिकाटे हे उपस्थित होते.

बहिणाबाईंचे काव्य आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक: डॉ. जयश्री देशमुख



सेलू / प्रशांत झाडे

(तालुका प्रतिनिधी): बहिणाबाई चौधरी हे नाव संपूर्ण महाराष्ट्रात सुपरीचीत आहे. माणूस शिक्षणाने मोठा होतो, मापसाला माणूसपण शिक्षण देते, या गोष्टी मोडीत काढण्याचे काम बहिणाबाई चौधरी यांनी केले. मापसाचा सर्वात मोठा गुरु हा त्याचा जीवन अनुभव असतो. बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या काव्यातून जीवनातील अनुभवाचे बोल सांगितले आहेत . औपचारिक शिक्षणाचा अभाव असतानाही बहिणाबाईंनी आपल्या अनुभव विश्वातून जीवनाचे मौलिक तत्त्वज्ञान मांडले. त्यांच्या कवितेतून संकटांना धैर्याने सामोरे जाण्याची, कष्टाला महत्त्व देण्याची आणि आनंदाने जीवन जगण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे बहिणाबाईचे काव्य आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक असून त्यांच्या जीवन विषयक जाणीव आजही तितक्याच प्रासंगिक असल्याचे मत मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जयश्री देशमुख यांनी आपल्या शोधनिबंधातून स्पष्ट केले. त्या यशवंत महाविद्यालय सेलू येथील स्टाफ क्लबच्या वतीने आयोजित 'बहिणाबाई चौधरी यांच्या जीवन विषयक जाणीवा' या विषयावरिल शोधनिबंध वाचन उपक्रमात बोलत होत्या. त्यांनी बहिणाबाईंच्या काव्यातील जीवनदृष्टी, संघर्ष, स्त्रीजीवनातील वास्तव आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान यांचा वेध घेतला. बहिणाबाईंच्या कवितेतून मानवी जीवनातील सुख-दुःख, कष्ट, संघर्ष, जिद्द, आत्मविश्वास आणि सकारात्मक जीवनदृष्टीचे प्रभावी दर्शन घडते असेही मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. यावेळी या शोधनिबंध वाचन उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. भूषण पुरणकार हे होते. प्रा.भूषण तुरणकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून बहिणाबाई च्या काव्याची महती विषद केली. महाविद्यालयातील प्राध्यापकांनी वेगवेगळ्या विषयांमध्ये नव - नवीन संशोधन केली पाहिजे व त्यांच्यामध्ये संशोधनाविषयी उत्साह निर्माण व्हावा या उद्देशासाठी स्टाफ क्लबच्या वतीने दैनंदिन शोधनिबंध वाचन या उपक्रमाचे आयोजन केल्या जाते.

प्रस्तुत शोधनिबंध वाचन उपक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप काळे, स्टाफ क्लब चे समन्वयक प्रा. डॉ. अनंत रिंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्टाफ क्लबच्या शोधनिबंध वाचन उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अर्चना बारंगे, प्रा. किशोरी कोहाड यांनी सहकार्य केले. शोधनिबंध वाचन कार्यक्रमाचे सूत्रसंचालनव आभार प्रा. संगीता खोडे यांनी मानले.

पंचमहाभूतांनी मर्यादा सोडल्यास मानवी सृष्टीचा विनाश अटळ- श्रीधर गाडगे

कारंजा (घा) : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कारंजा(घा.) शाखेचा २७ ऑक्टोबर ला कस्तुरबा विद्यालय येथे आयोजित विजयादशमी उत्सवात विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे इंद्रकुमार मोटवानी प्रमुख अतिथी म्हणून होते. व्यासपीठावर रामटेक विभाग संघचालक जयंत मुलमुले व कारंजा खंड संघचालक सुनील कडू उपस्थित होते.

श्रीधर गाडगे म्हणाले ज्या कार्यक्रमाच्या सोहळ्यात आपण बसलेलो आहोत या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे १०१ वे वर्ष आहे ,खऱ्या अर्थाने आता हिंदू समाजाचा शंभर वर्षाचा अनुभव गाठीशी बांधून संघाची पुढची वाटचाल चालणार आहे ,आपण सगळे या सृष्टीमध्ये राहतो या सृष्टीचा जर विचार केला तर ही सृष्टी पाच जगतामध्ये वाटलेली आहे त्याचं पहिलं जगत आहे ही पृथ्वी वर आकाश आहे तीन चतुर्थांश मध्ये पाणी आहे जीवन जगण्यासाठी वारा आहे वायू आहे आणि आकाशात तळपणारं तेज म्हणजे सूर्य आहे याला आम्ही पंचमहाभूत असे म्हणतो अशा पंचमहाभूतांचे हे जग आहे आणि हे पंचमहाभूत कधीही आपली मर्यादा सोडत नाही ,ज्या दिवशी ते मर्यादा सोडतील त्या दिवशी जगणे मुश्किल होईल .दोन महिन्यांपासून पाऊस येत नाही राज्यांमध्ये हाहाकार झालेला आहे जर पिकन बंद झाले तर आमची काय अवस्था होईल ही धरती माता आहे ती आम्हाला अन्न देते म्हणून आम्ही जगू शकतो उद्या जर सूर्याने तेज देणे बंद केलं तर आम्हाला जगता येणार नाही म्हणून हे सर्व मर्यादित राहतात. परमेश्वराने जी मर्यादा लागून दिलेली आहे त्या मर्यादित राहतात जेव्हा केव्हा याला हानी पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो त्यावेळी मात्र त्यांची मर्यादा सुटते आणि जर पंचमहाभूतांनी आपली मर्यादा सोडली तर त्याला प्रलय असे म्हणतात. म्हणजे प्रलय यायचा की नाही हे आता आमच्या हातात आहे. पंचमहाभूतांची ही दुनिया आहे. दुसरी दुनिया आहे ती वनस्पतीची आहे.सगळी जी वनस्पतीची दुनिया आहे ती आमच्यासाठी औषधीची दुनिया आहे, कोणतेही असे झाड नाही की ज्याच्यो औषध नाही ही वनस्पती सुद्धा आम्हाला जगण्यासाठी मदत करते. तिसरं जग आहे ते प्राण्यांचे जग प्राण्यांनी आपली मर्यादा कधीही सोडलेली नाही आणि चौथे जग हे मानवाचे आहे पण पहिल्या तीनही जगामध्ये त्यांनी आपल्या मर्यादा सोडलेली नाही प्राण्यांच्या या जगामध्ये जर गाईसमोर हिरवीगार गवताची पेंढी टाकली जर तिचे पोट भरले असेल तर ती खाणार नाही. परंतु या चारही दुनिया मध्ये सर्वात श्रेष्ठ दुनिया जर कोणती मानली जात असेल तर ती मानवाची दुनिया आहे. मानवाचा प्रवास हा नरापासून तर नारायणा पर्यंत चालते तर ती यात्रा खरी यात्रा असते आज आपण विजयादशमी उत्सव साजरा करीत आहोत



दरवर्षी आपण ऐकतो आपल्याला पाठ झालेले आहे विजयादशमी म्हणजे काय..? अधर्मावर धर्माचा विजय,अशक्यावर शक्यतेचा विजय, अनीपचारावर विवेकाचा विजय,वाईटावर चांगल्या चा विजय म्हणजे विजयादशमी. परंतु जेव्हा आपण दोन गोष्टी बघत असतो, जेव्हापासून या पृथ्वीवर मानव सृष्टी आली मानवसृष्टीमध्ये असं कुठलाही कालखंड गेला नाही की जिथे संघर्ष झाला नाही.अगदी देव दैत्यापासून ते वेदांच्या काळातही सज्जन शक्ती व दुर्जन शक्ती यांचे अस्तित्व होते म्हणूनच समाजामध्ये संघर्षही होता आणि आणि तो आजही आहे. भारताने जगाला दिलेली विश्वबंधुत्वाची शिकवण म्हणजेच वसुधैवकुटुंबकम ही भावना जर सर्व जगाने स्वीकारली तरच हा संघर्ष थांबेल आणि जगात शांतता प्रस्थापित होईल.

सामाजिक समरसता,कुटुंब प्रबोधन, पर्यावरण,नागरी शिष्टाचार आणि स्वत्व बोध बोध ही पंचपरिवर्तनाची पंचसूत्रे संघाने समाजाला दिली आहे.संघाचे स्वयंसेवकांनी परिवर्तनाचे हे सूत्र स्वीकारले परंतु जोपर्यंत संपूर्ण समाज या पंचसूत्रीचा स्वीकार करणार नाही तोपर्यंत भारत देश वैभवशाली होणार नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत गुणात्मक परिवर्तनासाठी सर्वेक्षणाची मदत होईल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मुंबई : शासकीय योजनांची व्याप्ती वाढविणे, अधिकाधिक नागरिकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे आणि त्यांच्या अंमलबजावणीतील परिणामकारकता तपासणे महत्त्वाचे असल्याने यासाठी सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी बरोबरच त्यामध्ये गुणात्मक परिवर्तन होण्यास मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

माहिती व जनसंपर्क विभागामार्फत नियुक्त ?क्विस माय इंडिया या संस्थेमार्फत विविध विभागांच्या योजनांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. यासंदर्भात सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि योजना पश्चात सर्वेक्षणाबाबत बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विविध शासकीय विभागांच्या सहकार्याने योजनांच्या सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. योजनांच्या कार्यप्रणालीचा अभ्यास, लाभार्थ्यांच्या माहितीचे विश्लेषण, योजनांमुळे साध्य झालेल्या परिणामांचे मूल्यमापन आणि त्यातून पुढील सुधारणांसाठी आवश्यक बाबी निश्चित करणे, अशा विविध स्तरांवर काम केले जात आहे. राज्यातल्या अधिकाधिक नागरिकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी या सर्वेक्षणांचा चांगला उपयोग होऊ शकतो. योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात सर्वेक्षणातून मिळणारी माहिती केवळ माहितीपुरती मर्यादित न ठेवता, त्यातून प्रत्यक्ष कामकाजात सुधारणा घडवून आणण्यास मदत होईल. उपलब्ध माहितीच्या आधारे योजनांची सद्यःस्थिती समजून घेणे, लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात येणाऱ्या अडचणी ओळखणे आणि अपेक्षित परिणाम साध्य करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे शक्य होणार आहे. त्यासाठी संबंधित विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांनी आवश्यक सहकार्य करावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या सर्वेक्षणाच्या माध्यमातून योजनांबद्दलची अचूक माहिती मिळण्यास मदत होईल तसेच शासनाच्या योजनांसाठी असणारा प्रतिसाद समजण्यास मदत होईल. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून अचूक डेटा बेस तयार होईल आणि लोकांना शासकीय योजनांचा अधिक लाभ मिळण्यास मदत होईल. या सर्वेक्षणातून शासकीय योजनांबाबत अधिक विश्वासार्हता निर्माण होऊन राज्य शासनास अचूक माहिती मिळेल आणि गुणात्मक परिवर्तन होण्यास मदत होईल.

क्षेत्रीय कार्यालयांचा सहभाग महत्त्वाचा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, योजनांची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी अधिक सुलभ करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांची भूमिका महत्त्वाची आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी आवश्यक सहकार्य करून माहिती संकलन व विश्लेषणाच्या प्रक्रियेत समन्वय साधावा आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पूरक वातावरण निर्माण करावे.

शासकीय यंत्रणा आणि संबंधित संस्थेने एकसंघ भावनेतून काम केल्यास योजनांच्या अंमलबजावणीत अधिक चांगले परिणाम साधता येतील. उपलब्ध माहितीचा योग्य वापर, समन्वयपूर्ण कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष क्षेत्रातील अनुभव यांच्या आधारे प्रशासकीय कामकाजात सुधारणा घडवून आणता येईल. या माध्यमातून शासनाच्या विविध योजना अधिक परिणामकारक होण्यासह नागरिकांपर्यंत त्यांचा लाभ पोहोचविण्याच्या प्रक्रियेत गुणात्मक परिवर्तन घडविणे शक्य होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

बैठकीस राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे अतिरिक्त मुख्यसचिव, प्रधान सचिव उपस्थित होते. तर विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह जिल्हास्तरीय अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांत सुधारणा करण्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे निर्देश



मुंबई : अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन भत्त्याच्या निकषांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

प्रोत्साहन भत्त्याच्या सुधारित निकषांबाबत कर्मचारी संघटनांच्या मागणीसंदर्भात मंत्रालयात बैठक झाली. त्यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी पोषण, आरोग्य, पूर्वशालेय शिक्षण, उपस्थिती आणि गृहभेटी आदी निकषांच्या आधारे प्रोत्साहन भत्ता निश्चित करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी बैठकीस एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त माधवी सरदेशमुख, सहसचिव वी. रा. ठाकूर आदीसह अधिकारी उपस्थित होते. राज्यात शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचे तसेच गर्भवती मातांच्या पोषणाची काळजी घेण्यासाठी १,०८,६२७ अंगणवाडी सेविका आणि १,०५,४७० अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना त्यांच्या कामाच्या गुणवत्तेनुसार अनुक्रमे ?१,५०० ते ?२,००० आणि ?५०० ते ?१,००० प्रतिमाह प्रोत्साहन भत्ता १ ऑक्टोबर २०२४ पासून लागू करण्यात आला आहे.

यावेळी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या अतिरिक्त आहार योजना, आदर्श अंगणवाडी योजना आणि बेबी केअर किट योजना यांचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात या योजनांच्या

विधानपरिषदेच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या पाच जागांचे निकाल जाहीर

मुंबई : महाराष्ट्र विधानपरिषदेतील पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या पाच जागांसाठी झालेल्या द्विवार्षिक निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हर्षदा देशमुख जाधव, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून काँग्रेसचे अभिजित गोविंदराव वंजारी, औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील, पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीचे कौस्तुभ मुरलीधर गावडे आणि अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून शिवसेनेचे किरण रामराव सरनाईक विजयी झाले.

भारत निवडणूक आयोगाने २२ सप्टेंबर २०२६ रोजी या पाच मतदारसंघांतील द्विवार्षिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार २३ ऑक्टोबर रोजी मतदान झाले. २७ ऑक्टोबरपासून सुरू झालेली मतमोजणी २९ ऑक्टोबर रोजी पूर्ण झाली. भारत निवडणूक आयोगाच्या मान्यतेने सर्व पाच मतदारसंघांचे निकाल घोषित करण्यात आले.

मतदारसंघनिहाय निकाल

पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात हर्षदा देशमुख जाधव यांना १,१३,८४० मते मिळाली. भाजपच्या डॉ. स्मिता योगेश जाधव यांना १,०३,९१२ मते मिळाली.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात काँग्रेसचे अभिजित गोविंदराव वंजारी यांना ६७,२३१ मते मिळाली. भाजपचे सुधाकर चिठ्ठलराव कोहळे यांना ६३,९६० मते मिळाली.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांना ८५,८७६ मते मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सतीश भानुदासराव चव्हाण यांना ६७,७५२ मते मिळाली.

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ मुरलीधर गावडे यांना २३,११७ मते मिळाली. अपक्ष सचिन नवनाथ सानप यांना १३,२४७ मते मिळाली.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किरण रामराव सरनाईक यांना १६,६६३ मते मिळाली. तर काँग्रेसच्या अदिती ऋषिकेश पोहरे यांना ८,६३६ मते मिळाली, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्यांविरुद्ध रामनगर पोलिसांची धडक कारवाई!

आयटीआय टेकडी व स्वावलंबी ग्राउंड परिसरात ८ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई

वर्धा : सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी रामनगर पोलिसांनी धडक मोहीम हाती घेतली असून, आयटीआय टेकडी व स्वावलंबी ग्राउंड परिसरात सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग करणाऱ्या ८ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

दि. २८ व २९ ऑक्टोबर रोजी रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आयटीआय टेकडी व स्वावलंबी ग्राउंड परिसरात पोलिसांकडून गस्त सुरू असताना सार्वजनिक ठिकाणी आरडाओरड करणे, नागरिकांना त्रास होईल असे वर्तन करणे तसेच सार्वजनिक शांततेला बाधा पोहोचविणारे प्रकार आढळून आले. याप्रकरणी पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेतील कलम ११० व ११७ अन्वये एकूण ८ प्रतिबंधात्मक कारवाया केल्या. सार्वजनिक ठिकाणी विनाकारण आरडाओरड करणे, नागरिकांना त्रास होईल असे वर्तन करणे अथवा सार्वजनिक शांततेला बाधा पोहोचविणारे कृत्य केल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

पोलिसांची भूमिका केवळ कारवाई करण्यापुरती मर्यादित नसून, नागरिकांमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण करणे, पोलिसांबद्दल विश्वास वाढविणे तसेच परिसरात शांतता, सुरक्षितता व सौहार्दाचे वातावरण निर्माण करणे हा देखील या मोहिमेचा उद्देश असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत निजामपूरखडी, स्वावलंबी ग्राउंड, तुकडोजी ग्राउंड, ऑरेंजसिटी पार्क, हनुमान टेकडी आदी परिसरात पोलिसांकडून सातत्याने गस्त व प्रतिबंधात्मक कारवाई सुरू आहे.

रामनगर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, सार्वजनिक ठिकाणी शांतता व शिस्त राखावी, कायद्याचे पालन करावे आणि पोलिसांनी केलेल्या कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

वर्ध्यात शनिवारी ओबीसी जनगणना महापरिषद



वर्धा : महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्म द्विशताब्दी वर्षाचे औचित्य साधून ओबीसी समाजात जनजागृती निर्माण करणे, जातिनिहाय जनगणनेची मागणी व्यापक करणे तसेच ओबीसी समाजाच्या संविधानिक अधिकारांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी संघटित जनआंदोलन उभे करणे, या उद्देशाने शनिवार ३१ ऑक्टोबर रोजी वर्धा येथे 'ओबीसी जनगणना महापरिषद'चे आयोजन करण्यात आले आहे.

ही महापरिषद सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शिववैभव सभागृह, बँचलर रोड, वर्धा येथे होणार आहे. ओबीसी जनजागृती संघटन, जिल्हा वर्धा आणि सर्व समविचारी सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने या महापरिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

महापरिषदेच्या

पहिल्या सत्राचे अध्यक्षस्थानी ओबीसी नेते व सकल ओबीसी महामोर्चाचे मुख्य संयोजक विजय वडेट्टीवार भूषविणार राहणार आहे. राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. खासदार अमर काळे, आमदार राजेश बकाने आणि आमदार सुमित वानखेडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. वर्धा नगर परिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगुळ स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित राहतील. प्रास्ताविक महापरीषद आयोजन समितीचे कार्याध्यक्ष शंकर घपाट आणि सकल ओबीसी महामोर्चाचे संयोजक उमेश कोरींग हे भूमिका मांडणार आहेत.

दुसऱ्या सत्रात दुपारी २ वाजता 'ओबीसी जातिनिहाय जनगणना संविधानिक अधिकार' या विषयावर विचारमंथन होणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक साहित्य व चळवळीचे अभ्यासक डॉ. अशोकजी चोपडे राहतील. प्रमुख व्याख्याते म्हणून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड येथील ईंग्रजी विभागप्रमुख डॉ. दिलीप चव्हाण मार्गदर्शन करणार आहेत. ॲड. अंजली साळवे, प्रा. शेषकुमार येरलेकर,. संतोष डंभारे, सुभाष अंधारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. या सत्राचे सूत्रसंचालन प्रज्ञा चौधरी करणार असून, प्रास्ताविक महापरीषद आयोजन समितीचे अध्यक्ष राजेंद्र कळसाईत आणि भूमिका ओबीसी जनजागृती संघटनचे अजय भेंडे मांडणार आहेत. महापरिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. पत्रकार परिषदेला नगराध्यक्ष सुधीर पांगुळ,डॉ. अशोक चोपडे आदींची उपस्थिती होती.

दिवाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर एसटी बसच्या जादा फेऱ्या



वर्धा : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वर्धा विभागाच्यावतीने दिवाळी हंगामाकरीता १ ते २२ नोव्हेंबर या कालावधी जादा फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी जादा प्रवास वाहतुकीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यामध्ये दि. ४ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबर पर्यंत वर्धा ते पुणे- पुलगाव, अमरावती, अकोला मार्गे दुपारी १२ वाजता, आर्वी ते पुणे – अमरावती अकोला मार्गे दुपारी ३ वाजता, वर्धा ते नांदेड - यवतमाळ, आर्णी मार्गे दुपारी १२ वाजता, आर्वी, परतवाडा ते नागपूर - अमरावती तिवसा मार्गे सकाळी ९.४५ वाजता, आर्वी, नागपूर ते दर्यापूर – मार्गे अमरावती सकाळी १० वाजता, हिंगणघाट ते परतवाडा मार्गे अमरावती सकाळी ६.४५ वाजता, पुलगाव, चंद्रपूर अमरावती – मार्गे हिंगणघाट, वर्धा, पुलगाव सकाळी ११.३० वाजता, हिंगणघाट ते चंद्रपूर मार्गे जाम दुपारी २ व सायंकाळी ४ वाजता, जादा बस सोडण्यात येणार आहे

तसेच दि. १ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत वर्धा बसस्थानकावरुन नागपूर-यवतमाळ, आर्वी बसस्थानकावरुन अमरावती, वरुड व मोर्शी, हिंगणघाट बसस्थानकावरुन चंद्रपूर, नागपूर, अमरावती, तळेगाव बसस्थानकावरुन नागपूर, अमरावती, मोर्शी, वर्धा, वरुड, अमरावती मार्गे कु-हा, पुलगाव बसस्थानकावरुन वरुड, चंद्रपूर, अमरावती व वर्धा जादा बस सोडण्यात येणार आहे.

दिवाळी निमित्त महामंडळाच्या बसने जाणाऱ्या तसेच येणाऱ्या समुहास एकत्रित थेट प्रवासाची सोय मिळावी याकरीता ॲडव्हॉस बुकींगची सोय विभागातील सर्व बसस्थानकावरुन देण्यात आलेली आहे. तसेच जेष्ठ नागरीक व महिला सन्मान योजना अंतर्गत देय असलेल्या तिकीट दराचे सवलतीसह ते दर्यापूर – मार्गे अमरावती ॲडव्हान्स बुकींग सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. ?सदर सवलतीचे लाभ घेण्यासाठी एन.सी.एम.सी कार्ड होणे अत्यावश्यक आहे. तसेच एन.सी.एम.सी कार्ड काढल्याची पावती व त्यावर असलेले कोड स्पष्ट दिसेल अशा प्रकारे प्रवासात ठेवण्यात यावी. प्रवाशांनी सदर जादा बस सेवेचा लाभ घेण्यासाठी आगार व्यवस्थापक, बसस्थानक प्रमुख यांच्याशी सपर्क साधावा, असे विभाग नियंत्रकांनी कळविले आहे.

रब्बी हंगामात कमी पाण्यातील पिकांना प्राधान्य द्यावे

वर्धा : जिल्ह्यात पावसातील तूट, जमिनीतील कमी झालेला ओलावा, विहिरी आणि बोअरवेलच्या पाणीपातळीत झालेली घट तसेच सिंचनाकरिता प्रकल्पातील पाणीसाठा लक्षात घेता, रब्बी हंगामातील पीक नियोजन करताना शेतकऱ्यांनी उपलब्ध होणाऱ्या पाण्याच्या पाळ्यांचा अचूक अंदाज घेऊनच पेरणी व पेरणी क्षेत्र निश्चित करावे. मुख्यतः कमी पाण्यात येणाऱ्या व जास्त नफा देणाऱ्या पिकांनाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

यंदाच्या रब्बी हंगामात प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीतही शेतकऱ्यांना समाधानकारक उत्पादन मिळावे, यासाठी कृषी विभागामार्फत पीक नियोजन, सिंचन व्यवस्थापन, सुधारित पीक पद्धती आणि शासकीय योजनांच्या लाभाबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. उपलब्ध सिंचन पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून, पाणी उपलब्ध होणाऱ्या गावातील शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत सिंचन नियोजनाची माहिती पोहोचविण्यावर भर देण्यात आलेला आहे.

सिंचनाच्या उपलब्धतेनुसार पीक नियोजन करावे

निम्न वर्धा, बोर व पोथरा सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात रब्बी हंगामासाठी पाणी उपलब्धतेनुसार पाणीपाळ्यांचे नियोजन करण्यात येत आहे. पाटबंधारे विभाग व प्रकल्प सल्लागार समितीच्या निर्णयानुसार सिंचनाचे वेळापत्रक निश्चित होणार असून, साधारणपणे पेरणी व पिकांच्या प्राथमिक वाढीसाठी नोव्हेंबरच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात पहिली पाणीपाळी आणि पिकांच्या गरजेनुसार डिसेंबर अखेर किंवा जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात दुसरी पाणीपाळी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नियोजन प्रस्तावित आहे.

कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड करावी

वर्धा जिल्ह्यातील काळ्या व मध्यम जमिनीसाठी हरभरा, करडई, मोहरी, जवस, मसूर आणि रब्बी ज्वारी ही पिके जमिनीचा प्रकार, उपलब्ध ओलावा व सिंचनाची सोय लक्षात घेऊन निवडावीत. करडई हे खोल मुळांमुळे तुलनेने दुष्काळसहिष्णू पीक असून, हरभरा पिकात जमिनीतील उर्वरित ओलाव्याचा प्रभावी वापर करता येतो. मोहरी, जवस व मसूर ही पिकेही कमी पाण्याच्या परिस्थितीत योग्य ठरू शकतात. सूर्यफूल पिकासाठी तुलनेने अधिक सिंचनाची आवश्यकता असल्याने त्याची निवड पाण्याच्या उपलब्धतेनुसार करावी. पिकांच्या संवेदनशील अवस्थेत पाण्याचा ताण पडू नये यासाठी शेतकऱ्यांनी ठिबक किंवा तुषार सिंचनाचा वापर करावा. जमिनीतील ओलाव्या टिकविण्यासाठी योग्य आच्छादन पद्धतीचा अवलंब करावा. आवश्यकतेनुसार कृषी विभागाच्या तांत्रिक मार्गदर्शनानुसार पिकांच्या

कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

अवस्थेला अनुरूप उपाययोजना कराव्यात. पोटॅशियम नायट्रेट किंवा ॲंटी-ट्रान्सपिरंटसारख्या निविष्ठांचा वापर संबंधित पिकासाठी शिफारस, योग्य मात्रा व कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसारच करावा.

बियाणे मिनीकिट व पीक प्रात्यक्षिकांचा लाभ घ्यावा

रब्बी हंगामात ज्वारी व मसूर पिकांच्या मिनीकिट योजनेतर्गत उपलब्धतेनुसार ज्वारीची १,००० आणि मसूरची ७०० मिनीकिटे वितरित करण्याचे नियोजन आहे. प्रति शेतकरी एक मिनीकिट या प्रमाणात ज्वारीचे ४ किलो व मसूरचे ८ किलो बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेल्या व निवड झालेल्या शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

पशुधनासाठी चारा नियोजन करणे आवश्यक

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध राहावा, यासाठी शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील कडबा, कुटार व इतर पीक अवशेषांची नासाडी टाळावी. पीक अवशेष जाळण्याऐवजी त्यांचा पशुखाद्य म्हणून योग्य वापर करावा. चारा ज्वारी, बाजरी, चवळी आणि नेपियर यांसारख्या चारा पिकांची निवड उपलब्ध पाणी व जमिनीच्या परिस्थितीनुसार करावी. बहुवार्षिक चारा पिकांची बांधावर लागवड करणे तसेच हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार करून साठवणूक करणे उपयुक्त ठरू शकते.

चारा पिकांच्या बियाणांसाठी कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग योजनेतर्गत उपलब्ध असलेल्या घटकांचा लाभ घ्यावा. चारा लागवडीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पात्रतेनुसार उपलब्ध कामांची माहिती संबंधित ग्रामपंचायत व पंचायत समिती यांच्याकडून घ्यावी. या योजनेतील कामे, मजुरी व साहित्य खर्च याबाबतची मदत मंजूर कामाच्या स्वरूपात व लागू नियमांनुसार दिली जाते.

कडबा व कुटार पावसापासून सुरक्षित, कोरड्या व हवेशीर ठिकाणी साठवावे. हिरव्या चाऱ्याची योग्य पद्धतीने मुरघास निर्मिती करून टंचाईच्या काळासाठी चारा राखून ठेवावा. चारा ज्वारीची कापणी व जनावरांना खाऊ घालण्याबाबत शिफारस केलेल्या वाढीच्या अवस्थेचे पालन करावे. विशेषतः लहान अवस्थेतील ज्वारीच्या चाऱ्यात विषारी घटकांचा धोका असल्याने तो जनावरांना खाऊ घालण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. अधिक माहितीसाठी: संबंधित गावातील सहायक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी अथवा तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच कृषी विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० वर संपर्क साधावा, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.